नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २११ * * अमरावती * मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पाच मुलींनी एकत्र घेतले विष

■ वृत्तसंस्था, औरंगाबाद (बिहार), दि. २ :

बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातील सैदपूर गावातून धक्कादायक घटना समोर आली आहे. पाच मुलींनी एकत्र विष प्राशन केल्याची माहिती मिळाली असून, यापैकी चार मुलींचा मृत्यू झाला आहे. या घटनेने गावात तणाव आणि घबराट निर्माण केली आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून, सध्या तपास सुरू आहे. घटना हसपुरा पोलिस स्टेशन हद्दीतील अमझर शरीफ पंचायतीच्या सैदपूर गावात घडली. प्राथमिक माहिती नुसार, पाच अल्पवयीन मुलींनी विष प्राशन केले. मृत्यूनंतर कुटुंबीयांनी चारही मुलींचे अंत्यसंस्कार केले, मात्र गावकऱ्यांनी या घटनेबाबत बोलण्यास टाळाटाळ केली.

# दादांचा मृत्यू संशयास्पद

## खा. संजय राऊत, आ. मिटकरी, वडेट्टीवारांकडून चौकशीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी / नागपूर / मुंबई, दि. २ :

अजित पवार यांचा गेल्या बुधवारी विमान अपघातात झालेला मृत्यू संशयास्पद असून, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शिवसेना उबाठा गटाचे राज्यसभा सदस्य खासदार संजय राऊत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (अप गट) विधानपरिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी तसेच काँग्रेसचे आमदार तथा माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.



संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चा सत्रात खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा उपस्थित करत या विमान अपघाताची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली. तसेच केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले.

संजय राऊत म्हणाले, अजित पवारांनी भाजपला उद्देशून म्हटले होते की 'माझ्यावर सिंचन घोटाळ्याचा आरोप करत असाल तर त्यातला पैसा फक्त आम्हीच नाही खाल्ला, भाजपने सुद्धा या घोटाळ्यात पैसा खाल्ला आहे आणि त्यांची फाइल सुद्धा माझ्याकडे आहे'. हे त्यांनी १५ जानेवारी रोजी म्हटले होते आणि १० दिवसांनी अजित पवारांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाला. मी आरोप करत नाही, पण हा मृत्यू संशयास्पद आहे.

### धूर नव्हता.. धोका होता!



विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या प्रश्नांवर आता त्यांच्याच पक्षातील नेते अमोल मिटकरी यांनी शंका उपस्थित केली आहे. धूर नव्हता, पण धोका होता, असे म्हणत त्यांनी या घटनेतील शत-प्रतिशत सत्य समोर यावे, अशी मागणी केली आहे. अजितदादांचा १०० टक्के घात झाला असून आपण शेवटपर्यंत लढा देणार असल्याचेही मिटकरी यांनी म्हटले आहे.

अमोल मिटकरी म्हणाले, या दुर्घटनेबाबत संपूर्ण सत्य बाहेर येणे अत्यावश्यक आहे. या संपूर्ण मुद्द्यावर आपली सविस्तर भूमिका मे महिन्यात जाहीर करणार असल्याचे त्यांनी सूचित केले. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्नही लक्षवेधी ठरले आहेत. दुर्घटनेत सहा जणांच्या मृत्यूचा उल्लेख असताना केवळ पाच मृतदेह कसे सापडले, सहावा व्यक्ती नेमका कुठे गेला, उड्डाणापूर्वी प्रवाशांची डिजिटल यादी उपलब्ध असतानाही या यादीत विसंगती का आढळते, असे प्रश्न उपस्थित केले आहेत.

दुर्घटनेनंतर कोणतेही कागद जळालेल्या अवस्थेत का सापडले नाहीत? पायलट वारंवार का बदलले गेले? या सर्व बाबी केवळ योगायोग आहेत का, की त्यामागे काही वेगळे कारण आहे? याचा तपास व्हावा, अशी त्यांची भूमिका दिसून येते. या प्रश्नांमधून कोणावरही थेट आरोप न करता, सत्य बाहेर यावे, एवढीच अपेक्षा आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केली आहे.

### कुठेतरी कट शिजला



राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येऊ नयेत म्हणून हा कट कुठे तरी शिजला आणि त्यातून ही ठिणगी पडली असे मला वाटते असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्रिपद हे संवैधानिक पद नाही त्यामुळे हे सर्व काही तेराव्यानंतर सुद्धा होऊ शकले असते. पण यामध्ये खूप काही शिजत आहे. अजित पवार यांची दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र याव्यात अशी इच्छा होती असे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सांगितले, त्यांनी अजित पवार यांची शपथ सुद्धा घेतली. पण आता राजकारण फार सडके झालेले आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

## ग्रोथ हबसाठी निधी नागपूरलाही फायदा...

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :



अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पात ग्रोथहबसाठी पाच वर्षात पाच हजार कोटी रुपये मिळणार असून त्याचा फायदा मुंबई, पुण्यासह नागपूरलाही होईल, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले याचे विवरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यानुसार केंद्र सरकारकडून प्रत्येक वर्षी पाच हजार कोटी रुपये असे पाच वर्षात मिळणार आहे. याचा फायदा मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआर), पुणे महानगर विकास प्राधिकरण आणि नागपूर महानगर विकास प्राधिकरणालाही होणार आहे, असा दावा करण्यात आला आहे.

या शिवाय पायाभूत सुविधा क्षेत्रात होणारी १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्सव्यवसाय आणि सिंचनासाठी केलेली भरीव तरतुदीचाही फायदा राज्यासह विदर्भाला होण्याची शक्यता आहे. महिला बचत गटासाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्वाची आहे.

प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणा?्या मुलींसाठी वसतिगृहाची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्आलयात आताप चिकित्सा व्यवस्था उभी करण्यासाठी घेतलेला निर्मय आरोग्य क्षेत्रात महत्वाचा ठरणारा आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, उद्योग रोजगारनिर्मिती वाहतूक, लॉजेस्टिक आणि शहरी विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. या निधीमुळे विदर्भात आर्थिक केंद विकसीत होईल. यामुळे आगामी काळात रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नागपूरला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा हा निर्णय असल्याचे मत एक्सएसआयओ डंडस्ट्रियल पार्कचे संचालक आशीष अग्रवाल यांनी व्यक्त केले. मेट्रोसाठी अर्थसंकल्पात ५२० कोटी रुपये मिळाले आहे. यामुळे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

## सपाट आणि शहरी अर्थसंकल्प




केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी यावषीर्चा अर्थसंकल्प सादर केला. आपल्यावर जवळजवळ जीडीपीच्या ५६% च्या आसपास कर्ज आहे, हे प्रमाण ५०% पेक्षा आत आणण्याचा निर्धार अर्थमंत्र्यांनी केलेला आहे. तो कितपत साध्य होईल हे भविष्याच्या पोटात दडलेले आहे. या अर्थसंकल्पात लोकानुनय करण्यासाठी काहीच केलेले नाही, एकही आकर्षक घोषणा नाही. सर्वसामान्य जनतेला आयकरात किती सुधारणा होते यामध्ये रस असतो. निर्मलाबाईंनी दरवर्षी १२ लाख रुपये कमावणाऱ्यांना शून्य कराची घोषणा गेल्या वर्षीच केली होती. आता या मुद्दयावर फारसे काही करण्याचे बाकी नव्हते, त्यामुळे हा वर्ग फारसा खुश नसला तरी नाराजही नाही. काल अर्थसंकल्प सादर केल्याबरोबर शेअर बाजारात घनघोर घसरण झाली. शेअरवरील दिवसेंदिवस वाढणारा नफा यापुढे अनिश्चिततेच्या मार्गाने जाणार आहे तसेच फ्युचर आणि ऑप्शन यावरील एसटीटी वाढविलेला आहे त्याचा थेट धक्का शेअर बाजारावर जाणवला. अमेरिकेचे अध्यक्ष लहरी लाला ट्रम्प यांनी भारताला अनेक बाबतीत घेरण्याचा प्रयत्न केलेला आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे ट्रम्प अतिनाराज आहेत. तिकडे भारताचा कट्टर वैरी असलेल्या भिकारचोट पाकिस्तानला मैत्रीचा संदेश आणि आपला सन्मान कायम राखून राहणा?या आपल्या देशाला जबर फटके देण्याचा कार्यक्रम भारताला कठीण काळात घेऊन जाईल असे वाटत होते. परंतु या अर्थसंकल्पापूर्वीच जीएसटीच्या प्रणालीत सामान्य जनतेच्या हिताचे बदल, तसेच अमेरिका सोडून इतर युरोपियन राष्ट्रांबरोबर घेण्यात आलेले काही धोरणात्मक निर्णय यामुळे अमेरिकेच्या नाकावर टिच्चून आपण सात टक्केच्या वर आपली गतिमानता दाखवलेली आहे. अर्थमंत्र्यांनी यावर्षी मूलभूत बाबींना लक्ष्य केलेले आहे, त्यामध्ये संरक्षण क्षेत्रावरील निधीत भरीव वाढ केलेली आहे. ऊर्जा, शिक्षण आणि आरोग्य यावरही लक्ष दिलेले आहे. अर्थमंत्री म्हणतात त्याप्रमाणे आपल्याला आपल्यावरील कर्जाचा बोजा जीडीपीच्या सहा टक्क्यांनी कमी करायचा आहे. जगातील उद्योगांनी भारतात गुंतवणूक करून आपल्या उत्पादनांची निर्यात करावी त्यासाठी त्यांना करातून मुक्ती देण्यात आलेली आहे. यंदा नौकानयनाला महत्व देण्यात येईल त्यासाठी मोठे-मोठे कंटेनर्स लागतात. त्याच्या उत्पादनाकडे आता कुठे सरकारने लक्ष दिलेले आहे पण याबाबतीत चीन आपल्यापेक्षा कितीतरी पटीने पुढे आहे. आपल्या देशातील महानगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर जन आवक वाढल्यामुळे नवेनवे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामध्ये कपात व्हावी म्हणून दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांच्या विकासासाठी यावर्षी प्रयत्न करण्यात येणार आहेत. पर्यटनासाठी भारताला पसंती मिळावी त्यासाठी उत्तम वातावरण निर्मिती करणे हे सुद्धा फलदायी ठरेल असे दिसते. छोट्या आणि मध्यम उद्योग धंद्यांना भाग भांडवल आणि आधार मिळावा यासाठीही आता सरकारला जाग आल्याचे दिसते. अनेक मोठ्या शहरात लवकर पोहोचण्यासाठी गतिमान रेल्वे गाड्यांचे नियोजन करण्यात आलेले आहे. एकूण अर्थसंकल्प पाहता शेतकऱ्यांच्या बाबतीत यंदाच्या अर्थसंकल्पाने फारसे काही दिलेले दिसत नाही, देशातील ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. ही जनता ग्रामीण भागातील आहे दुर्दैवाने यावर्षी अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी फारसे काही केल्याचे दिसत नाही. आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहोत अशा फुशारक्या आपण मारतो पण आजही कडधान्य आणि तेलबिया यांच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण नाही. अमेरिकेच्या व्यापार युद्धात सर्वाधिक फटका कापड उद्योगानंतर शेती क्षेत्राला बसला आहे. परंतु अर्थमंत्री त्या बाबतीत चकार शब्द बोलायला तयार नाहीत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार होते ते तर सोडाच, शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी एकही गोष्ट निर्मलाबाईंनी केलेली नाही. घासून घासून जुन्या झालेल्या त्याच त्या योजना थोड्याफार स्वरूपात बदल करून पुढे रेटणे आणि त्यासाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूदही न वापरणे अशी सध्याची स्थिती आहे. ज्या ज्या राज्यात निवडणुका असतील त्या त्या राज्यासाठी काही आकर्षक घोषणा करायच्या हा नवा पायंडा बाईंनी सुरू केलेला आहे. त्यामुळे यंदा तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ वगैरे राज्यांसाठी थोड्याफार प्रमाणात केलेल्या घोषणा वगळता शेतकऱ्यांच्या हाती भोपळाच आलेला आहे. दुर्दैवाने ग्रामीण भागाचा विकास किंवा शेतकऱ्यांसाठी केवळ जय रामजी, रामजी शिवाय दुसरे काहीच दिसत नाही. एकूणच हा अर्थसंकल्प फारच सपाट वाटणारा आहे. पण तरीही त्यात धोरणीपणाने भविष्यात आर्थिक सुधारणा होतील याचे भान ठेवले आहे, असे म्हणता येईल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## दिल्ली दरबारी पोहचला चंद्रपूर काँग्रेसचा वाद

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :

चंद्रपूर महापालिकेत महापौर पदाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. त्याआधी काँग्रेस महासचिव के.सी वेणुगोपाल यांच्याकडे उद्या ३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत बैठक होणार आहे.

या बैठकीनंतर तोडगा निघेल असे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. दरम्यान वडेट्टीवार गटाचे नगरसेवक राजेश अड्डूर यांनी रविवारी काँग्रेस नगरसेवकांच्या बैठकीची नोटीस खासदार प्रतिभा धानोरकर गटाच्या नगरसेवकांच्या घरावर चिपकावल्याने वडेट्टीवार आणि धानोरकर गटात तणाव वाढला आहे.

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचा महापौर बसावा यासाठी हालचालींना सुरुवात झाली आहे. पण काही घटनांमुळे निर्णय लांबणीवर पडला असून याबाबत काँग्रेस पक्षाची महत्वाची बैठक उद्या ३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत होणार आहे. महापौर व गटनेता याबाबत पक्षश्रेष्ठींवर निर्णय सोडला असल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

## १८८६ पानी आरोपपत्रात शीतल तेजवानीच आरोपी

### मुंढवा जमीन गैरव्यवहार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:


पुण्यातील मुंढवा परिसरातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात अखेर आरोपपत्र दाखल करण्यात आले असून या घडामोडीने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

आर्थिक गुन्हे विभागाने न्यायालयात सादर केलेल्या या दोषारोपपत्रात फक्त शीतल तेजवानी यांचे नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात आधी चर्चेत असलेली दिग्विजय पाटील आणि पार्थ पवार यांची नावे आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या दोघांना या टप्प्यावर दिलासा मिळाल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कालच केली होती. त्यानंतर लगेचच आरोपपत्र दाखल झाल्याची माहिती समोर आली.

## सरकारला कशाची भीती?

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :



सोमवारी लोकसभेत राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान जोरदार वाद झाला.

माजी लष्करप्रमुख जनरल नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाचा हवाला देत त्यांनी सांगितले की, डोकलाममध्ये चार चिनी रणगाडे भारतीय हद्दीत घुसले होते. राहुल यांनी हे बोलताच प्रथम संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि नंतर गृहमंत्री शाह यांनी त्यांना अडवले. यानंतर, सभापतींनी नियमांचा हवाला देत त्यांना थांबवले. त्यानंतर सभापतींनी लोकसभा दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब केली.

## मुंबईत मनसे भाजपसोबत?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

### राज ठाकरेंनी शक्यता फेटाळली

मुंबई महापालिकेच्या सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असून भाजप मोठी राजकीय चाल खेळण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. राज ठाकरे यांच्या मनसेकडून भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवाराला पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजप, शिंदे यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांना सोबत घेतल्यानंतर महापौरपदाच्या निवडणुकीत संख्याबळ मजबूत करण्यासाठी भाजप सक्रिय झाल्याचे संकेत आहेत. मात्र, दुसरीकडे राज ठाकरे यांनी ही शक्यता फेटाळली आहे. मनसे भाजपला पाठिंबा देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे या शक्यतेवर पडदा पडला आहे.

## 'मराठी' विरुद्ध 'तमिळ' संघर्ष पेटणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

मुंबई महापालिकेच्या निवडणुकांचे वारे अजून शांत झाले नाहीत, तोच शहरात प्रादेशिक अस्मितेचा नवा वाद उफाळून आला आहे. सायन-कोळीवाडा येथील भाजप आमदार तमिळ सेल्वन यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला आहे. आमच्याविरोधात बोलाल, तर मुंबईत १ लाख तमिळ बांधवांचा मोर्चा काढू, असा थेट इशारा सेल्वन यांनी दिल्याने मुंबईत आता 'तमिळ-मराठी' वादाची नवी कुरुक्षेत्रं तयार होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सायन कोळीवाडा ते माटुंगा येथील ऐतिहासिक मुरुगन मंदिरापर्यंत हजारो भाविकांच्या उपस्थितीत 'पाळकुडम कावडी अट्टम' रॅली काढण्यात आली होती. या रॅलीचं नेतृत्व भाजप आमदार तमिळ सेल्वन करत होते. पारंपरिक वाद्यं आणि कावडींच्या गजरात निघालेल्या या धार्मिक रॅलीत सेल्वन यांनी अचानक राज ठाकरेंच्या जुन्या विधानाचा समाचार घेत राजकीय बॉम्ब टाकला.

### सुळे केंद्रात, पाटील राज्यात, रोहित मंत्रिमंडळात आणि पक्षाची सूत्रे दादांकडे..

## अजित पवार, जयंत पाटलांमधील बैठकीचा तपशील समोर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत पडद्यामागे काय चर्चा झाली होती, याचे काही तपशील समोर आल्याने राजकीय वर्तुळात नव्याने खळबळ उडाली आहे.

विलीनीकरणानंतर एकत्रित पक्षाने महायुतीत सहभागी व्हावे, असा प्राथमिक आराखडा चर्चेत होता. या आराखड्यात केंद्रात सुप्रिया सुळे यांना मंत्रिपद आणि राज्य मंत्रिमंडळात शरद पवार गटातील एका नेत्याला स्थान देण्याचा प्रस्ताव मांडला गेला होता. तसेच, एकत्र येणाऱ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाबाबत अंतिम निर्णय शरद पवार घेतील, अशी रूपरेषा अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत चर्चिल्याचे सांगितले जाते.

माहितीनुसार सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद तर जयंत पाटील यांना राज्यात मंत्रिपद देण्यात येणार होते. तर रोहित पवार यांनाही राज्यात राज्यात राज्यमंत्री पद देण्यात येणार होते. इतकेच नाही तर नवीन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद हे खासदार अमोल कोल्हे यांच्याकडे सोपवण्यावर एकमत झाले होते. केंद्राची संपूर्ण जबाबदारी सुप्रिया सुळेंवर तर राज्यातील संपूर्ण जबाबदारी अजित पवारांकडे राहिल, असेही निश्चित झाले होते, अशी माहिती समोर आली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर या चर्चांना अधिक वेग आला. शरद पवार गटातील नेत्यांनी दोन्ही राष्ट्रवादींमध्ये विलिनीकरणाची अंतिम चर्चा झाल्याचा दावा केला. त्यासाठी जयंत पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीचा उल्लेख करण्यात येत आहे. या बैठकीत पुढील राजकीय दिशा ठरवण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

मुंबईतील जयंत पाटील यांच्या घरी २३ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत शरद पवार गटातील सुमारे १४ नेते उपस्थित होते आणि अजित पवार यांच्यासोबत जवळपास अडीच तास चर्चा झाली. या प्रस्तावात केंद्र आणि राज्यातील मंत्रिपदांची शक्यता, तसेच संघटनात्मक निर्णयप्रक्रियेची रूपरेषा यांचा समावेश होता. या नव्या माहितीने राजकीय क्षेत्रात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

## एफडीएच्या आयुक्तपदी श्रीधर दुबे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबे यांची बदली अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए )आयुक्तपदी करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांची नेमणूक दिव्यांग कल्याण आयुक्त, पुणे म्हणून करण्यात आली आहे. महाराष्ट्र एड्स नियनंतरण २२२२ प्रकल्प संचालक डॉ. सुनील भोकरे यांची मुंबईत शहरी आरोग्य विभागाचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. गृह विभागाचे सहसचिव राहुल कुलकर्णी यांची पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली करण्यात आली आहे.

### ॲडव्हांटेज विदर्भमध्ये सहभागी होणार

## २३ देशातील राजदूत व व्यापार प्रतिनिधी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :




नागपुरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंबाझरी परिसरात ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ - खासदार औद्योगिक महोत्सवातील आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेकरिता प्रथमच २३ हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

या उपक्रमातून विदर्भातील आणि स्थानिक उद्योगांना निर्यातीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, अशी माहिती असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

विदर्भाच्या औद्योगिक विकासाला आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवण्यासाठी ॲडव्हांटेज विदर्भ आहे. विकासाला बळ या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव भारताच्या औद्योगिक नकाशावर विदर्भाला एक सक्षम व उदयोन्मुख केंद्र म्हणून अधोरेखित करणार आहे. या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेचे उद्घाटन शनिवार ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे.

सायंकाळी ५ वाजता दक्षिण आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरिबियन, रशिया, चीन तसेच आफ्रिकी देशांवरील विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रांमध्ये संबंधित देशांचे राजदूत अथवा व्यापार प्रतिनिधी त्यांच्या देशातील गरजा, आयातक्षम वस्तू आणि व्यवसायाच्या संधींबाबत विदर्भातील उद्योजकांना मार्गदर्शन करतील.

परिषदेत रशिया, चीन, ब्राझील, इजिप्त, टोगो, गयाना, बेनिन, उरुग्वे, नायजेरिया, झांबिया आणि व्हेनेझुएला यांच्यासह एकूण २३ देशांचा सहभाग राहणार आहे. सध्या या देशांमध्ये भारतातून, विशेषतः विदर्भातून कृषी क्षेत्रातील तांदूळ, वीज वहन मनोरे, वस्त्रोद्योगातील सूत तसेच पोलादाची निर्यात केली जाते. या वस्तूंच्या निर्यातीत वाढ होण्यासोबतच नव्या उत्पादनांसाठीही संधी उपलब्ध होतील.

या परिषदेच्या माध्यमातून विदर्भातील उद्योजकांना आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींशी थेट संवाद साधून आपली उत्पादने जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्याचा मार्ग खुला होईल. त्यातून या भागात मोठ्या प्रमाणावर सगळ्याच क्षेत्रात तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता असल्याचे काळे यांनी सांगितले. पत्रपरिषदेला असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अशोक गोयल, अनूप खंडेलवाल, संजय गुप्ता, राजेश बागडी, राजेश रोकडे, रिना सिन्हा आणि शिवराव उपस्थित होते.

विशेष आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांना यापूर्वी तयार करण्यात येणारे संगणक कार्यक्रम केवळ निर्यातीसाठीच वापरता येत होते. देशांतर्गत वापरासाठी त्यावर मर्यादा होत्या.

ही अडचण असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर यंदाच्या अर्थसंकल्पात आवश्यक सुधारणा झाल्याने आता हे संगणक कार्यक्रम देशांतर्गत वापरासाठीही उपलब्ध होऊ शकेल. या बदलामुळे विदर्भातील लहान माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विदर्भातील अनेक लहान आयटी कंपन्यांना ॲडव्हांटेज विदर्भाच्या माध्यमातून येथे येणाऱ्या २५ विकसनशील देशांमध्ये या क्षेत्रात व्यवसायवृद्धीच्या मोठ्या संधी असल्याचे ते म्हणाले.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी घेतली विदीप जाधवांच्या कुटुंबियांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :



उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आज सुनेत्रा पवार यांचा पहिला दौरा सातारा जिल्ह्यातील कराड आणि फलटणला आहे. त्यांनी आज सकाळी १० वाजता कराडच्या प्रीतीसंगम येथे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेत, अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी अजित पवारांचे पीएसओ विदीप जाधव यांच्या कुटुंबियांचीही भेट घेतली.

यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे, खासदार नितीन पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, माजी आमदार बाळासाहेब पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

२८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवारांसोबत त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव यांचाही मृत्यू झाला होता. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विदीप जाधव यांच्या तरडगाव (ता. फलटण) येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. स्वर्गीय विदीप जाधव यांच्या पत्नी व मुलांच्या डोक्यावर मायेने हात फिरवत, कोणत्याही अडचणीत मी तुमच्या सोबत आहे, असा शब्द देत त्यांनी जाधव कुटुंबीयांना आधार दिला.

# नैसर्गिक तेल व वायूची बचत ही देशसेवा

## ऊर्जा संवर्धनासाठी सक्षम २०२५-२६ अभियानाची सुरुवात : मंगलप्रभात लोढा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

नैसर्गिक तेल व वायूची बचत करणे ही देशाची सेवा आहे. विकसित भारत २०४७ च्या उद्दीष्टामधील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे इंधन बचत हे ध्येय असून प्रत्येकाच्या सहभागाने देश हे ध्येय साध्य करेल. तेल व वायूचे संवर्धन करणे म्हणजे हरित ऊर्जेचा अंगीकार करणे हा आपल्या प्रत्येकाच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

प्रभादेवी रवींद्र नाट्य मंदिर येथे केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्य शासनाच्या सहकार्याने तेल उद्योगातील राज्यस्तरीय समन्वयकांकडून विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्याअंतर्गत 'संरक्षण क्षमता महोत्सव २०२५-२६' चा मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचे राज्यस्तरीय समन्वयक उमेश कुलकर्णी, महाराष्ट्र बीपीसीएलचे प्रमुख रिटेल (पश्चिम)चे थॉमस जेम्स, एमएच-१ आणि गोवा, बीपीसीएलचे राज्य प्रमुख (रिटेल) चे



मिहिर जोशी, एचपीसीएलचे उपमहाव्यवस्थापक बरुण कुमार, आयओसीएलचे महाव्यवस्थापक देवांशू मिश्रा, गेल इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक (विपणन) जितेंद्र गुप्ता, राज्य समन्वयक विभाग मुख्य प्रबंधक दीपक वाघ, राज्य समन्वयक विभाग वरिष्ठ प्रबंधक रितेश जाधव, शालेय विद्यार्थी तसेच राज्यातील विविध इंधन वितरक उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले की, राज्य तेल व समन्वय विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संरक्षण समता महोत्सव अभियानाचा उद्देश जीवाश्म इंधनांचा अपव्यय कमी करणे, परकीय चलनावरील वाढता भार रोखणे तसेच हरितगृह वायूंमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान कमी करणे हा आहे. आज जगभरात ऊर्जेला सर्वाधिक मागणी आहे. जागतिक स्तरावरील राजकारण तेलाभोवती एकवटले आहे. इंधनाची बचत करणे म्हणजे देशाच्या प्रगतीला हातभार लावणे असे आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त वापर करून आपण तेल बचत करू शकतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात हरित उर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. शालेय जीवनामध्ये तेल संवर्धनाचे महत्त्व पटवून दिल्यास भविष्यात त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. प्रत्येक घटकाचा तेल बचतीमधील खारीचा वाटा हा देशाच्या प्रगतीला हातभार लागू शकतो असे मत मंत्री लोढा यांनी व्यक्त केले.

## अजितदादा आपल्यात असते तर चित्र वेगळे असते



■ पुणे : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अजित पवारांचे अकाली निधन झाले आणि संपूर्ण राज्यात शोककळा पसरली. त्यानंतर अवघ्या तीनच दिवसात सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री पदासाठी निवडले आणि शपथविधी देखील पार पडली. यावरून अजित पवारांच्या निधनानंतर राजकीय घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळाले. आता देखील दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. या घटनांवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी आपले मत व्यक्त केले आहे. रोहित पवारांनी ट्विट करत म्हटले की, माननीय अजितदादा गेल्यापासून अनेकजण राजकीय चर्चा करताना दिसतायत, पण आज कोणत्याही राजकीय चर्चेपेक्षा अजितदादांच्या जाण्याच्या दुःखाची व्याप्ती कितीतरी पट मोठी आहे. अजितदादा आपल्यात असते तर चित्र वेगळं असतं आणि दादांशिवाय कुणीही त्यावर चर्चाही केली नसती, पण आज दादाच आपल्यात नाहीत. पुढे रोहित पवार म्हणाले, अजित दादांचं जाणं हे आपल्या सर्वांवरच आभाळ कोळसल्यासारखं आहे आणि अशा वातावरणात कुणीही राजकीय चर्चा करणं योग्य वाटत नाही. त्यामुळं पवार कुटुंबातील एक सदस्य म्हणून माझी सर्वांनाच हात जोडून विनंती आहे की, दादांच्या आत्म्याला क्लेश होईल, त्यांच्या विचारांना ठेच पोचेल आणि त्यांच्या स्पष्ट व परखड स्वभावाला साजेसं वाटणार नाही.

## राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विलीनीकरण होणार होते



■ मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही पक्षांचे विलीनीकरण होणार होते, हे 2000% सत्य आहे, असे म्हणत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी हा दावा केला आहे. अजित पवार यांच्या अस्थींचे दर्शन घेण्यासाठी आव्हाड यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यालयाला भेट दिली. तसेच अस्थींचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना विरणीकरणाची चर्चा सुरू होती, असा दावा केला आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, आज राजकारणावर बोलणे योग्य नाही. आम्ही अजित पवार यांच्या अस्थींचे दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी आलो आहोत. अशावेळी अपघात कसा झाला? काय झालं? याविषयी प्रश्न विचारणे किंवा बोलणे देखील योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विलिनीकरण होणार होते, हे 2000% खरे असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्यासारखा नेता आजपर्यंत झालेला नाही. त्यांची निर्णय क्षमता आणि काम करण्याचा हातोटी, होती असे देखील जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. कोणताही निर्णय घेण्यात त्यांचा हात कोणीही पकडू शकत नाही, असे देखील जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. राज्यात सुरू असलेल्या विलीनीकरणाच्या चर्चेदरम्यान जितेंद्र आव्हाड यांनी केलेले हे वक्तव्य महत्त्वाचं मानलं जात आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतले मच्छिंद्रनाथाचे दर्शन



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यात असलेल्या मलंगगडावर आज माघ पौर्णिमेनिमित्त भक्तीचा महापूर लोटला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऐतिहासिक मलंगगडाला भेट देऊन मच्छिंद्रनाथांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी शिवसेनेच्या वतीने गडावर पारंपरिक पद्धतीने भगवा ध्वज फडकवण्यात आला. 'जय मच्छिंद्र, जय मलंग'च्या जयघोषाने अवघा परिसर भक्तीमय झाला होता. प्रसारमाध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आदेश आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही मलंगगड यात्रा आजही त्याच जोमाने सुरू आहे.

हे केवळ धार्मिक स्थळ नसून लाखो भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. मलंगगडावरील काही बांधकामाबाबत न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रकरणात लवकरच अपेक्षित असलेला निर्णय येईल असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. हिंदुची वहिवाट हीच मलंगमुक्तीची पहाट असा जयघोष करीत राज्यभरातून तसेच परराज्यातून लाखो भाविक मलंगनाथाच्या दर्शनासाठी मलंगगडावर दाखल होतात. नाथांच्या समाधीचे दर्शन घेऊन मलंग गडावर नाथांचा जयघोष दुमदुमतो. यावर्षीच्या यात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे नव्याने सुरू झालेली फ्युनिक्युलर (रोपवे) सेवा. या सेवेमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग भाविकांना गडावर चढणे सुलभ झाले आहे. "राज्यभरातून आणि परदेशातून येणाऱ्या भाविकांची संख्या वाढतेय, ही आनंदाची बाब आहे," असेही उपमुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कल्याणपासून ११ किमी अंतरावर असलेले मलंगगड हे हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्मीयांच्या आस्थेचे केंद्र आहे. मुस्लिमांसाठी ही १२ व्या शतकातील सुफी संत हाजी अब्दुल रहमान (हाजी मलंग बाबा) यांची दर्गा आहे, तर नाथ संप्रदायाचे अनुयायी याला मच्छिंद्रनाथांचे समाधी स्थळ मानतात.

## मुंबई महापालिकेत भाजप गटनेतेपदी गणेश खणकर यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :



मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असतानाच भारतीय जनता पक्षाचा गटनेता अखेर ठरला आहे. अभ्यासू आणि अनुभवी नगरसेवक गणेश खणकर यांची भाजपच्या गटनेतेपदी वर्णी लागली आहे. महापालिकेच्या कामकाजाचा दीर्घ अनुभव आणि विषयांची सखोल जाण असलेला चेहरा म्हणून खणकर यांच्याकडे पाहिले जाते. भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी गणेश खणकर यांच्या गटनेतेपदी निवडीची घोषणा केली. गणेश खणकर हे मुंबई महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधून निवडून आले आहेत. भाजपचे मुंबई महामंत्री म्हणून त्यांनी संघटनेत दीर्घकाळ सक्रिय भूमिका बजावली आहे. महापालिकेच्या नियमावलीची सखोल माहिती आणि प्रशासकीय कामकाजाचा दांडगा अनुभव असलेला 'अभ्यासू नगरसेवक' अशी त्यांची ओळख आहे. गणेश खणकर यांच्या निवडीमागे त्यांचे जनहितार्थ केलेले धाडसी कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. मुंबईत सक्रिय असलेल्या टँकर माफियांविरोधात खणकर यांनी सातत्याने आवाज उठवला असून, सामान्य नागरिकांना पाण्यासाठी होणारी लूट थांबवण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आशिष शेलार यांनी खणकर यांच्या या कार्याचे नेहमीच कौतुक केले असून, त्यांना या लढ्यात भक्कम पाठिंबा दर्शवला आहे.

## लाडकी बहीण योजनेच्या पुढील हप्त्यासाठी पुन्हा केवायसी अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या अनेक महिलांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. योजनेच्या पुढील हप्त्यांचा लाभ मिळवण्यासाठी काही लाभार्थी महिलांना पुन्हा एकदा केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. प्रशासकीय स्तरावर झालेल्या बदलांमुळे तसेच बँक खात्याशी संबंधित तांत्रिक कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

योजनेतील काही महिलांच्या खात्यांमध्ये मागील हप्त्यांची रक्कम जमा झालेली नाही. यामागे प्रामुख्याने आधार कार्ड बँक खात्याशी लिंक नसणे, खाते निष्क्रिय असणे किंवा अर्जात दिलेल्या माहितीत तफावत असणे ही कारणे असल्याचं सांगण्यात येत आहे.

काही प्रकरणांमध्ये प्रणालीत तांत्रिक माहिती अपूर्ण राहिल्यामुळे पुन्हा पडताळणीची गरज निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून असं स्पष्ट करण्यात आलं आहे की, ज्या महिलांनी वेळेत केवायसी प्रक्रिया पूर्ण केली, त्यांच्या थांबलेल्या मागील हप्त्यांसह सध्याचा हप्ता एकत्रितपणे खात्यावर जमा होण्याची शक्यता आहे. मात्र, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास पुढील हप्तेही रखडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## मुलांमधील डिजिटल व्यसनाच्या अभ्यासासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



मुलांमधील वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनामुळे त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने 29 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल (इकॉनॉमिक सर्वे 2025-26) मध्ये तरुण आणि अल्पवयीन मुलांमध्ये सोशल मीडिया व्यसनाचे वाढते धोके अधोरेखित करण्यात आले आहेत. या अहवालात मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा ठरविणे तसेच अल्पवयीनांना उद्देशून असलेल्या डिजिटल जाहिरातींवर निर्बंध आणण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या अहवालाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या दृष्टीने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेत माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्याबाबत लेखी निर्देश देण्यात आले आहेत. माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.शेलार यांनी नमूद केले की, राज्यात 18 वर्षांखालील चार कोटी मुले असून त्यापैकी तीन कोटी मुले 15 वर्षांखालील आहेत. त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचा प्रश्न महत्वपूर्ण आहे.

आपल्या पत्रात त्यांनी इंडियन सायकियाट्रिक सोसायटीच्या 77व्या वार्षिक राष्ट्रीय परिषदेत सादर करण्यात आलेल्या निष्कर्षांचाही उल्लेख केला आहे. या परिषदेत तरुणांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचे निदर्शनास आले असून, 50 टक्क्यांहून अधिक मानसिक आजारांची सुरुवात 18 वर्षांपूर्वी होत असल्याचे तसेच 35 वर्षांखालील वयोगटात या समस्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तातडीची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आर्थिक पाहणी अहवालातील शिफारसी आणि तज्ज्ञांनी मांडलेल्या अभ्यासाच्य आधारे राज्यासाठी संतुलित व माहितीपूर्ण धोरण ठरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने या विषयाचा सखोल अभ्यास करावा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.शेलार यांनी दिले आहे. आवश्यक असल्यास सर्वांगीण अभ्यासासाठी तज्ज्ञांचा कार्यदल स्थापन करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहे. या कार्यदलामध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, बालसमुपदेशक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञ, डॉक्टर, कायदेतज्ज्ञ तसेच संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

## भाजपला कुबड्या नकोत



■ मुंबई : नाशिक महापालिकेच्या महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत तणावाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी भाजपला कुबड्यांची गरज नाही, असे वक्तव्य केल्यानंतर शिंदे गटातील शिवसेना नेते संतप्त झाले आहेत. या मुद्द्यावर थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्याचा निर्णय शिवसेनेने घेतला आहे. एका वाक्यामुळे नाशिकमधील राजकीय वातावरण अचानक तापल्याचे चित्र आहे. नाशिक महापालिकेत भाजपने स्वबळावर निवडणूक लढवली होती. त्यानंतर भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांनी शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस यांना सत्तेत सहभागी होण्याचा प्रस्ताव दिला होता. सत्तास्थापनेसाठी समन्वय साधण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव असल्याचे सांगण्यात आले. महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या पदांवर वाटाघाटी होऊ शकतात, अशी चर्चा सुरू होती. मात्र, या प्रस्तावानंतर काही दिवसांतच मंत्री गिरीश महाजन यांनी भाजपला कुबड्यांची गरज नाही, असे वक्तव्य करत स्पष्ट नाराजी व्यक्त केली. या वक्तव्याने शिवसेनेत संतापाची लाट उसळली. भाजपकडून आलेल्या प्रस्तावानंतर आता अशी भूमिका घेणे अनाकलनीय असल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. शिवसेना उपनेते अजय बोरस्ते यांनी या संबधीची नाराजी उघडपणे व्यक्त केली. भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार स्वतः आमच्या पक्ष कार्यालयात आले होते. त्यांनी सत्तेत सहभागी होण्याचा प्रस्ताव दिला. आणि आता त्यांचे वरिष्ठ नेते कुबड्या नको असे म्हणत आहेत. हा शब्दप्रयोग चुकीचा आहे, असे बोरस्ते म्हणाले.

## चर्चेत नव्हते, त्यांना बैठकीबद्दल काय माहिती असणार? फडणवीसांचा दावा फेटाळत शरद पवारांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येणार का, यावरून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. 28 जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला. त्याआधी 17 जानेवारीला शरद पवार आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत जयंत पाटील यांच्या निवासस्थानी दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणासंदर्भात बैठक झाल्याचा दावा शरद पवार गटातील नेत्यांकडून सातत्याने केला जात आहे. या दाव्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे नकार दिला होता.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले होते की, दोन्ही राष्ट्रवादी विलीन होणार असत्या तर अजित पवार यांनी त्यांना याबाबत सांगितले असते. ते माज्याशी सर्व गोष्टी शेअर करायचे, असा त्यांचा दावा होता. मात्र, या वक्तव्यानंतर शरद पवार यांनी पत्रकारांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत या विषयावर ठोस प्रतिक्रिया दिली. त्यांच्या विधानामुळे या चर्चेला पुन्हा वेग आला आहे.

शरद पवार यांनी प्रतिप्रश्न उपस्थित करत म्हटले, विलीनीकरणाच्या चर्चेत जे उपस्थित नव्हते, त्यांना बैठकीबद्दल काय माहिती असणार? या एका वाक्याने त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दाव्यावर अप्रत्यक्षपणे सवाल उपस्थित केला. अजितदादा गटातील काही नेत्यांकडून मागील दोन दिवसांपासून अशा कोणत्याही चर्चा झाल्याचे नाकारले जात असताना पवारांचे हे विधान विशेष लक्षवेधी ठरले आहे.

या घडामोडींमुळे शरद पवार विरुद्ध देवेंद्र फडणवीस असा नवा राजकीय वाद उभा राहण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अजित पवारांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत दोन्ही राष्ट्रवादींच्या भवितव्याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. जयंत पाटील यांच्या घरी बैठक झाल्याचा दावा एकीकडे, तर त्याचे खंडन दुसरीकडे, अशा विरोधाभासी भूमिकांमुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अजितदादा गटातील नेते विलीनीकरणाच्या चर्चांना नकार देत असताना शरद पवारांनी सूचकपणे बैठकीचा उल्लेख केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आणि अजितदादा गटाचे नेते काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अजित पवारांच्या अंत्यसंस्कारात गर्दीतुन २५ लाखांचे दागिने चोरी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील अंत्यसंस्कारावेळी चोरट्यांनी गदींचा फायदा घेत 12 ते 15 जणांचे सुमारे 25 लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. 28 जानेवारी रोजी झालेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे, विशेषतः मोठ्या पोलिस बंदोबस्तातही हा प्रकार घडला. अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, इतर पक्षांचे नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने जमले होते. याप्रकरणी मोहम्मद सादिक मोहम्मद सिराज, मोहम्मद अनिस मोहम्मद युनुस, येजाज भग्गू मिरावले (सर्व रा. दिग्रस, यवतमाळ), राजकुमार बाबुराव आठवले (रा. गेवराई, बीड), बाळ बबन बोथे (रा. पळसदेव, ता. इंदापूर, पुणे) आणि त्याचे दोन साथीदार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारीस मतदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

राज्यातील 12 जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत 125 पंचायत समित्यांमध्ये शनिवार दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.


यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.


अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या - पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या - अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

## कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा गोदावरी गौरव पुरस्कार जाहीर





■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २ :

मराठी साहित्य, कला, विज्ञान आणि समाजसेवेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याची परंपरा जपणाऱ्या नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा गोदावरी गौरव पुरस्कार यंदाही जाहीर करण्यात आला आहे. कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी नाशिक येथे हा सन्मान सोहळा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी विज्ञान, साहस, चित्रकला, लोकसेवा, नाट्य आणि संगीत या विविध क्षेत्रातील सहा मान्यवरांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. अनिरुद्ध पंडित (विज्ञान), आशिष माने (साहस), चंद्रमोहन कुलकर्णी (चित्रकला), अभिनेते सयाजी शिंदे (लोकसेवा), अभिनेते प्रशांत दामले (नाट्य) आणि उस्ताद उस्मान खान (संगीत) यांना यंदाचा गोदावरी गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष कवी प्रकाश होळकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जाणिवा जपणाऱ्या कुसुमाग्रजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. समाजासाठी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणे, हेच या पुरस्कारामागचे मुख्य उद्दिष्ट आहे. दर दोन वर्षांनी दिला जाणारा हा पुरस्कार आज केवळ नाशिकपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातील एक मानाचा सन्मान म्हणून ओळखला जातो.

हा पुरस्कार सोहळा रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे मंगळवार, दि. १० मार्च २०२६ सायंकाळी आयोजित करण्यात येणार आहे. या सोहळ्यात कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष, ज्येष्ठ कवी व साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

### पुरस्काराचे स्वरूप

प्रत्येक पुरस्कार्थीस रुपए २१,००० रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तात्यासाहेब शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार सामाजिक बांधिलकीचे प्रतीक मानला जातो.



अमरावती- माजी मंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांनी बारामती येथे अजित पवार यांच्या निवासस्थानी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि दादांचे पुत्र जय पवार यांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# डीआरआयची 'सर्जिकल स्ट्राईक' मध्ये चार आरोपींना अटक

- 7 कोटी 50 लाखांचा 4 किलो 902 ग्रॅम मेफेड्रोन जप्त
- शहरातील ड्रग्ज तस्करीचा पर्दाफाश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )-** महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) अहमदाबाद युनिटने अमरावती शहरात आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करीचा भक्कम पर्दाफाश केला आहे. एनडीपीएस कायद्याअंतर्गत सुरू असलेल्या चौकशीदरम्यान रविवारी दुपारी विशेष 'सर्जिकल स्ट्राईक' मोहिमेत 7 कोटी 50 लाखांची 4 किलो 902 ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त करण्यात आली. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जप्त झालेल्या एमडीचा आंतरराष्ट्रीय बाजारभाव लक्षात घेतल्यास, ही खेप मोठ्या ड्रग्ज डीलशी संबंधित असल्याचे स्पष्ट होते. डीआरआयच्या विशेष पथकाने नवसारी परिसरातील फ्लॅट्सवर छापा टाकला, जिथे एमडीचा मोठा साठा सापडला. या कारवाईदरम्यान ताब्यात घेण्यात आलेल्या पहिल्या आरोपीच्या चौकशीतून दुसरा आरोपी अटक झाला, आणि नंतर इतर दोन आरोपींनाही ताब्यात घेतले गेले.

## चार दिवसांचा एमसीआर

फैसल खान अन्सार खान (22, गुलिस्ता नगर, अमरावती), अवैझ अहमद आरिफ अहमद (25, कसाबपुरा, चांदूर बाजार), मुस्तकीम खान अब्दुल ताहेर खान (29, कसाबपुरा, चांदूर बाजार),शेख परवेझ शेख नासिर (32, चांदनी चौक, हत्तीपुरा, अमरावती) या चारही आरोपींना जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणीनंतर 2 जानेवारी रोजी अमरावती जिल्हा न्यायालयात हजर केले असता, तीन दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. डीआरआयने पुढील कायदेशीर प्रक्रियेस सुरुवात केली आहे.

## मध्यप्रदेशातून आली एमडी

जप्त केलेली खेप मध्यप्रदेशातून आणण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. सध्याच्या कारवाईत 'लहान मासे' अडकले असून, या रॅकेटमागील मोठे मासे अद्याप अजून मोकाट आहेत. शहरातील वाढता एमडी व्यापार आधीही विधानसभेत उचलला गेला होता, मात्र ठोस कारवाई झाली नव्हती. नागरिकांच्या मते, मोठ्या आरोपींवर कारवाई न झाल्यास ड्रग्ज रॅकेट पूर्णपणे समाप्त होणार नाही.

# ड्रग्ज जप्ती शहरासाठी धोक्याची घंटा- जिल्हाधिकारी

## एमडी ड्रग्सबाबत कठोर कारवाईचे निर्देश



**अमरावती** – महसूल गुप्तचर संचालनालयाने पाच किलो एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स जप्त करून केलेली कारवाई शहरासाठी धोक्याची घंटा असल्याचे नमूद करत अंमली पदार्थांविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. युवकांमध्ये अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती करावी, तसेच स्थानिक पोलिस यंत्रणांनी समन्वय वाढवून एमडी ड्रग्सविरोधात ठोस कारवाई करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात नार्को को-ऑर्डिनेशन सेंटरच्या जिल्हास्तरीय समितीची मासिक बैठक पार पडली. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखेडे यांनी अंमली पदार्थांच्या स्थितीबाबत माहिती सादर केली. अंमली पदार्थांच्या विळख्यात किशोरवयीन मुले अडकत असल्याने येत्या 15 दिवसांत समाजकल्याण विभागातील सर्व वसतिगृहे व शाळांमध्ये जनजागृतीपर व्याख्याने आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आऊटरिच कार्यक्रमांद्वारे समाजात जागृती करीत 'नशामुक्त भारत, खुशहाल भारत' या संकल्पनेनुसार विशेष अभियान राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. अमरावतीतील अलीकडील कारवाईच्या पार्श्वभूमीवर बंद घरे व फ्लॅट्सवर निगराणी वाढवून गोपनीय पोलिस यंत्रणा सतर्क ठेवावी, गरज भासल्यास तडीपारीची कारवाई प्रस्तावित करावी, असेही जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले. तसेच अन्न व औषधी प्रशासन विभागाने रासायनिक व औद्योगिक परिसरातील बंद कारखान्यांवर विशेष लक्ष ठेवून अंमली पदार्थांचे उत्पादन होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# दोन दुचाकींची भीषण धडक; पतीचा मृत्यू, पत्नी व मुलगा गंभीर जखमी

## बहिरमबाबांच्या दर्शनावरून परतताना अपघात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 2 )-** बहिरम मार्गावरील खरपी फाट्याजवळ दोन दुचाकींमध्ये झालेल्या भीषण धडकेत एका युवकाचा मृत्यू झाला, तर त्याची पत्नी व पाच वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री उशिरा घडली. संबंधित कुटुंब बहिरमबाबांच्या दर्शनासाठी जाऊन घरी परतत होते. मृतकाचे नाव जीवन पांडुरंग बेलसरे (वय 34, रा. जनुना, ता. अकोट) असे आहे. या अपघातात त्यांची पत्नी फुलवंती बेलसरे (वय 30), पाच वर्षांचा मुलगा अमन तसेच मित्र धनराज लालबहादूर कासोदे (वय 32) गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जीवन बेलसरे हे कुटुंबासह दुचाकी क्रमांक एमएचक्ष्27 डीएस 8148 वरून बहिरमबाबांच्या दर्शनासाठी गेले होते.

दर्शन आटोपून परतत असताना महेश उपहारगृहाजवळ समोरून येणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएचक्ष्27 सीओ 6998 ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही दुचाकींवरील प्रवासी रस्त्यावर फेकले गेले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमींना अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारासाठी नेत असतानाच जीवन बेलसरे यांचा मृत्यू झाला. पत्नी, मुलगा व मित्रावर सध्या उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे कळते. दरम्यान, दुसऱ्या दुचाकीवरील चालक व त्याचा सहप्रवासी यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे जनुना गावात शोककळा पसरली आहे.

## सात गोवंशांना जीवनदान

**अमरावती** – परतवाडा परिसरातील ब्राम्हणवाडा थडी पोलिस स्टेशन हद्दीत पोलिसांनी अवैध गोवंश वाहतूक करणाऱ्या तस्करांवर धडक कारवाई केली. 29 जानेवारी रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सापळा रचून, चार गायी आणि तीन वासरांसह सात गोवंशांना मृत्यूच्या दाढेतून वाचवले. गोपनिय माहितीनुसार, ट्रकमध्ये गोवंश अत्यंत क्रूर आणि अमानवीय पद्धतीने वाहतूक केले जात होते. पोलिसांनी करजगाव येथील गजानन महाराज मंदिरा जवळील कॅनॉलवर सापळा रचून ट्रक थांबवला. झडतीत तस्करांचा हा धंदा उघडकीस आला. सातही गोवंशांना ताब्यात घेऊन पोलिसांनी सुरक्षित स्थानी गोरक्षणात पाठवले, तर ट्रक चालवणाऱ्यांवर कठोर कारवाईची नोटीस दिली आहे.

# चांदूर बाजारात वाळू तस्करांमध्ये धडकी

## महसूल पथकाच्या धडक कारवाईने काळ्या धंद्याला चाप



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.2 )-** तालुक्यातील काजळी ते माधान रोडवर महसूल विभागाच्या गस्ती पथकाने अचानक धडक कारवाई केल्याने वाळू तस्करांची चांगलीच धडकी भरली आहे. पथकाची चाहूल लागताच हायवा वाहनातून कन्हान नदीची अवैध वाळू रस्त्यावर टाकून चालकाने पलायन केले. मात्र महसूल प्रशासनाने तत्काळ कारवाई करत सदर वाळू साठा जप्त केला असून नियमानुसार त्याचा लिलाव करण्यात आला.

या निर्धारपूर्वक कारवाईमुळे तालुक्यातील अवैध वाळू वाहतुकीवर मोठा आळा बसला असून तस्कर गोटात खळबळ उडाली आहे. महसूल विभागाच्या कठोर भूमिकेचे सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत होत असताना, कायदा मोडणाऱ्यांत अस्वस्थता पसरली आहे. ही कारवाई प्रभारी तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये निवासी नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, शिरजगाव कसबा मंडळ अधिकारी परवेज पठाण, तलाठी संकेत घोरपडे व वैभव मनवार, कोतवाल स्नेहल कुन्हाडे, वाहन चालक दिनेश राठोड तसेच पोलीस पाटील अतुल भोंगडे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

दरम्यान, तालुक्यातील बहिरम येथील चेक पोस्टवरून मोठ्या प्रमाणात वाळू वाहतूक होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. तरीही तेथील तपास यंत्रणा नेमकी कुणाच्या दबावाखाली मौन बाळगून आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. बहिरम चेक पोस्टवरील कारभाराची सखोल चौकशी कधी होणार, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

## पतीकडून शारीरिक-मानसिक छळ

**अमरावती** – नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहाटगाव येथील 53 वर्षीय विवाहित महिलेने पतीविरुद्ध शारीरिक व मानसिक छळाची तक्रार दाखल केली आहे. नागपूरच्या झंडा चौकात सासरी राहणाऱ्या या महिलेला पती लग्नापासून छळ करत असून, वारंवार तिच्या माहेरच्यांकडून पैसे मागत अत्याचार करत असल्याचा आरोप आहे.

# जुन्या वादातून 18 वर्षीय तरुणावर चाकू हल्ला



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 2 )-** गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील लक्ष्मी नगर परिसरात जुन्या वादातून दोन भावांनी आणि त्यांच्या साथीदारांनी रामानुज राजा हेरोड (वय 18) या तरुणावर धारदार शस्त्रांनी हल्ला करून जखमी केल्याची धक्कादायक घटना शनिवारी उशिरा रात्री घडली. हल्ल्यानंतर आरोपींनी परिसरात दहशत माजवत वाहनांची तोडफोड केली. तत्पर पोलिस कारवाईत अवघ्या तासाभरात तीन अल्पवयीन मुलांसह सात आरोपींना अटक करण्यात आली. या हल्ल्यात रामानुज यांच्या छातीत व हाताला गंभीर जखमा झाल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हल्ल्यानंतर आरोपींनी परिसरात उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड करून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर विभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने तात्काळ कारवाई करत मांडवा झोपडपट्टी परिसरात लपून बसलेल्या आरोपींना शोधून काढले.

पोलिसांचा आवाज ऐकताच पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन अल्पवयीन मुलांसह एकूण सात आरोपींना अवघ्या तासाभरात अटक करण्यात आली. ही कारवाई डीबी पथकाचे प्रमुख मनोज मानकर यांच्या नेतृत्वाखाली वैशाली चव्हाण, प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, विनोद माळवे, अमोल यादव, सिद्धार्थ श्रृंगारे व सचिन गौरखेडे यांच्या पथकाने केली. पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास फुंडकर तसेच वरिष्ठ पोलिस अधिकारी कृष्णा पाटील, जे. समाधान वठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## लक्ष्मीनगरात वाहनांची तोडफोड, सात आरोपी ताब्यात

# अमरावती महापालिकेत पहिले सिंधी महापौर

## तेजवानी महापौर, भेंडे उपमहापौर; भाजप-युवा स्वाभिमान-राष्ट्रवादी युती निश्चित







**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 ) –** अमरावती महानगरपालिकेच्या आठव्या सभागृहासाठी महापौर व उपमहापौर पदांच्या निवडणुकीपूर्वीच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि युवा स्वाभिमान पक्ष यांच्यातील युती अधिकृतपणे निश्चित झाली आहे. युतीनुसार महापौर व उपमहापौर पदांसाठी अडीच वर्षांच्या कार्यकाळाची पदवाटणी करण्यात आली असून, भाजपचे नगरसेवक श्रीचंद तेजवानी हे पहिले सिंधी महापौर म्हणून विराजमान होणार आहेत.

### पदवाटणीची रूपरेषा

भाजपकडून पहिल्या सव्वा वर्षासाठी श्रीचंद तेजवानी आणि दुसऱ्या सव्वा वर्षासाठी आशिष अतकरे यांची महापौरपदासाठी घोषणा करण्यात आली आहे. उपमहापौरपदासाठी युवा स्वाभिमान पक्षाकडून पहिल्या टर्मसाठी सचिन भेंडे आणि दुसऱ्या टर्मसाठी अजय जयस्वाल यांची नावे निश्चित केली आहेत. महापालिकेची पुढील पुनर्रचना आठ वर्षांनंतर होणार असून, सत्तासंघर्षावरील चर्चांना युतीच्या घोषणेमुळे पूर्णविराम मिळाला आहे.

### युतीकडे सभागृहात भक्कम बहुमत

भाजपचे 25, युवा स्वाभिमान पक्षाचे 15 आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे 11 नगरसेवक मिळून युतीकडे 51 नगरसेवकांची मजबूत संख्या आहे. तथापि, राष्ट्रवादी काँग्रेसला कोणतेही प्रमुख पद देण्यात आलेले नाही. शिंदे गटातील तीन नगरसेवकांची भूमिका अद्याप अस्पष्ट आहे, तर स्थायी समिती अध्यक्षपदाबाबत अनिश्चितता कायम आहे. काँग्रेसने विरोधी पक्षाची भूमिका प्रभावीपणे बजावण्याची तयारी दर्शविली आहे.

### कोअर कमिटीच्या बैठकीत शिक्कामोर्तब

सोमवारी सकाळी भाजपचे निवडणूक पर्यवेक्षक आमदार संजय कुटे व शहराध्यक्ष नितीन धांडे यांच्या उपस्थितीत कोअर कमिटीची बैठक झाली. येथे महापौर व उपमहापौर पदांसाठी प्रत्येकी सव्वा वर्षांची मुदत निश्चित करण्यात आली. कृष्णा नगर विभागातून विजयी झालेले श्रीचंद तेजवानी यांना पहिल्या टर्मसाठी महापौरपदाची संधी देण्यात आली, तर रवी नगर विभागातून विजयी आशिष अतकरे यांना दुसऱ्या टर्मसाठी निश्चित करण्यात आले. उपमहापौरपदासाठी साई नगर विभागातून विजयी सचिन भेंडे व बडनेरा नवीन बस्ती विभागातून अजय जयस्वाल यांची नावे निश्चित झाली आहेत.

### इतिहास घडणार : सिंधी समाजात उत्साह

श्रीचंद तेजवानी यांचे महापौरपदासाठी नाव जाहीर होताच शहरातील सिंधी समाजात आनंदाचे वातावरण पसरले. अमरावती महानगरपालिकेत प्रथमच सिंधी समाजातील व्यक्ती महापौरपदावर विराजमान होत असल्याने समाजबांधवांनी भाजपचे आभार मानले. हा निर्णय शहराच्या राजकीय इतिहासात नवा अध्याय ठरणार आहे.

### स्थायी समिती राष्ट्रवादी राहणार ?

महापौर व उपमहापौर पदांची भाजप व युवा स्वाभिमानमध्ये वाटणी झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसकडे अद्याप काय हे चित्र स्पष्ट झाले नाही. मात्र महत्वपूर्ण असलेल्या स्थायी समितीवर राष्ट्रवादी आपला दावा नक्कीच करेल यात दुमत नाही.

### आतापर्यंत भूषविले महापौर

डॉ. देवीसिंह शेखावत (1992), प्रभाकर सव्वालाखे (1993), गोविंद अग्रवाल (1994), विद्या देशपांडे (1995), किरण महल्ले (1996), प्रवीणआप्पा काशीकर (1997), नितीन वानखडे (1998), विलास इंगोले (1999), दीपाली गवळी (2002), मिलिंद चिमोटे (2005), अशोक डोंगरे (2007), ॲड. किशोर शेळके (2009), वंदना कंगाले (2012), चरणजितकौर नंदा (2014), संजय नरवणे (2017), चेतन गावंडे (2019).

# नागपुरीगेट पोलिसांनी 9 गोवंश वाचविले



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )-** नागपुरीगेट चौक परिसरात कत्तलखान्याकडे नेले जात असलेले 9 गोवंश पोलिसांच्या तत्काळ कारवाईत वाचवले गेले. संबंधित वाहनही पोलिसांनी जप्त केले असून, सर्व गोवंशांना सुरक्षितपणे गो-रक्षण केंद्रात पाठवण्यात आले आहे.

नागपुरीगेट पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक तेजल शिंदे हे त्यांच्या कर्मचाऱ्यांसह पेट्रोलिंग करत असताना सीआरओकडून माहिती मिळाली की चांदनी चौक ते नागपुरीगेट चौक मार्गावर एका चारचाकी वाहनातून गोवंशांची निर्दय तस्करी सुरू आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ शोधाशोध सुरू केली आणि नागपुरीगेट चौकात संशयित वाहन आढळून आले. वाहनात 9 गोवंश कोंबून भरलेले होते, मात्र वाहनचालक घटनास्थळी उपस्थित नव्हता. पोलिसांनी गोवंशांची ताबडतोब सुटका करून त्यांना गो-रक्षण केंद्रात हलवले. याप्रकारे पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा आर्थिक आणि जीविताचा धोका टळला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक तेजल शिंदे यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना अशी तस्करी लक्षात आल्यास त्वरित संबंधित पोलीस स्टेशनला कळवण्याचे आवाहन केले आहे.

# ही भाजपाचीच इच्छा!

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील बरीच समिकरणे बदलण्याची शक्यता आहे. २०२३ मध्ये जेंव्हा अजित पवार हे आपले काका शरद पवार यांची साथ सोडून, पक्षातील आमदारांचा मोठा गट बरोबर घेऊन भाजपा बरोबर गेले, तेंव्हा त्यांचा तो निर्णय चुकीचा तर ठरणार नाही ना, अशी शंका व्यक्त केली जात होती. त्यातच लोकसभा निवडणुकीत अजित पवार गटाचा मोठा पराभव झाल्यानंतर, अजित पवार यांनी भाजपा बरोबर जाण्याचा घेतलेला निर्णय चुकीचा ठरल्याचे बोलले जात होते. त्याला कारण ही तसेच होते. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने लढविलेल्या १० जागांपैकी ८ जागा जिंकून नेत्रदीपक यश मिळवले होते. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी मधील काही नेत्यांमध्ये चलबिचल सुरू झाली होती. सुदैवाने अजित पवार यांचा गट सत्तेत सहभागी असल्याने, पक्षाला गळती लागली नाही.

अजित पवार आणि त्यांच्या नेतृत्वाखालील गटाचे नशीब चांगले असल्याने, विधानसभा निवडणुकीत त्यांना चांगले यश मिळाले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने ४१ जागा जिंकून चांगली कामगिरी केली आणि भाजपा बरोबर जाण्याचा अजित पवार यांचा निर्णय बरोबर ठरला.

महत्त्वाचे म्हणजे विधानसभा निवडणुकीतील यशाने, अजित पवार यांना आत्मविश्वास मिळवून दिला. विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या गटाची कामगिरी अतिशय खराब झाली आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गट व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट यांनी एकत्र यायला हवे हा विचार शरद पवार गटात बळावला.

थोडक्यात सांगायचे झाल्यास,शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटांनी एकत्र येण्याची मागणी, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर लगेचच सुरू झाली.


अभय गोखले

नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी निराशाजनक झाली आणि शरद पवार गटातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना असुरक्षित वाटू लागले.त्यांना आपल्या भवितव्याबाबत काळजी वाटू लागली. त्यानंतर झालेल्या महानगर पालिका निवडणुकीत तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे अक्षरशः पानिपत झाले.

२९ महानगर पालिकांमधील एकूण २८६९ जागांपैकी, राष्ट्रवादी (शप) ला केवळ ३६ जागांवर विजय मिळाल्याने,पक्षाच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राष्ट्रवादी (शप) मधील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा धीर सुटू लागला.

या दरम्यान एक महत्त्वाची घटना घडली.पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भाजपा बरोबर युती होऊ शकणार नाही, ही गोष्ट लक्षात आल्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाने, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाशी निवडणूक समझोता केला आणि दोन्ही गट एकत्र येण्याची प्रक्रिया खऱ्या अर्थाने तेथून सुरू झाली.

आता राष्ट्रवादी (शप) मधील काही नेते दावा करत आहेत की अजित पवार हे दोन्ही गटांच्या विलिनीकरणासाठी इच्छुक होते.अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे, विलिनीकरणा बाबत दोन्ही गटांमध्ये नक्की काय चर्चा झाली, याबद्दल आता निश्चितपणे काही सांगता येणार नाही.

एक गोष्ट मात्र निश्चित आहे ती म्हणजे, राष्ट्रवादी (शप) ला विलिनीकरणाचे जास्त वेध लागले आहेत. प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ या अजित पवार गटाच्या नेत्यांनी, ज्या वेगाने काही निर्णय घेतले ते थक्क करणारे होते. सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधीमंडळ गटनेतेपदी झालेली निवड आणि त्यानंतर त्यांचा उपमुख्यमंत्री म्हणून झालेला शपथविधी, या घटना इतक्या वेगाने घडल्या की,त्याचा अंदाज फारच थोड्या लोकांना आला असेल.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे राष्ट्रवादीचे संस्थापक आणि सर्वेसर्वा शरद पवार यांनाही या घटनेबाबत अंधारात ठेवण्यात आले.या मागे दोन कारणे असावीत. पहिले कारण म्हणजे अजित पवार यांच्या पश्चात, त्यांच्या गटाचा ताबा राष्ट्रवादी (शप) कडे जाण्याची भीती, तातडीने निर्णय घेणाऱ्या, अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांना वाटली असावी.

दुसरे कारण म्हणजे, शरद पवार गटाची आपल्याला गरज नाही,हे त्या नेत्यांना आपल्या कृतीतून दाखवून द्यायचे असावे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या निर्णय प्रक्रियेत शरद पवार गटाला खड्यासारखे बाजूला ठेवणारे वरील नेते, भविष्यात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणामधील सर्वात मोठा अडथळा ठरू शकतील.

या बाबतीतील लक्षणिय बाब अशी आहे की, अजित पवार गट सत्तेत सहभागी आहे.त्यामुळे सत्तेमध्ये कुणी वाटेकरी होऊ इच्छित असेल तर, ती गोष्ट ते कदापि मान्य करणार नाहीत. शरद पवार गटाचा विलिनीकरणाचा आग्रह समजण्यासारखा आहे. कारण लागोपाठच्या पराभवांनंतर, राष्ट्रवादी (शप) च्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची झाले आहे.

राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर बराच काळ पक्ष सत्तेवर होता, त्यामुळे सत्ता नसेल तर पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते बेचैन होतात आणि मग विकासाच्या नावाखाली जो पक्ष सत्तेवर असेल त्या पक्षात सामील होतात. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतरचा राजकीय घटनाक्रम लक्षात घेतला तर, भाजपाला जे हवे होते तसेच घडून आल्याचे आपल्या लक्षात येईल.

शरद पवार यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा भाजपाचा इरादा जवळ जवळ यशस्वी झाला आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटांचे विलिनीकरण नजिकच्या काळात झाले नाही तर शरद पवार यांचा गट सोडून, अजित पवार यांच्या गटात जाणाऱ्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची रीघ लागेल आणि ती थांबवणे शरद पवार यांच्यासाठी अशक्यप्राय गोष्ट होऊन बसेल.

सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या शपथविधी पासून शरद पवार आणि त्यांच्या इतर नेत्यांना लांब ठेवणाऱ्या, अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांना नेमके हेच हवे आहे आणि भाजपाचीही तीच इच्छा असणार.

------------------

**(हे लेखकाचे वैयक्तिक मत आहे.)**

# सर्वमान्य लोकनेता 'अजित दादा'!

अजित दादा अनंताच्या प्रवासाला निघून गेले आपल्या कार्याचा ठसा जनमानसात रूजवून. त्यांच्या कार्याची सुरूवात सुर्योदयापूर्वी होत होती आणि शेवट सुर्योदयानंतरच! ते ही उशीराने. एवढा त्यांच्या कार्याचा आवाका होता. ते स्पष्टवक्ते, वेळेचे भान ठेवणारे, विनोद वृत्ती जपणारे, दुरदृष्टी बाळगणारे असे संयमी व्यक्तीमत्व होते.

कधी कधी बोलण्याचा ओघात त्यांचा पणं तोल जात होता. हे नाकारून चालणार नाही. अशा प्रसंगी ते माफी मागून, आपली चूक कबूल करून मोकळे होत असत. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. शरदचंद्रपवार यांच्या सारख्या राजकारणातील उत्तुंग व्यक्तीमत्वाच्या छायेखाली त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. राजकारणातील खाच खळगे, नितीशास्त्र, चढ उतार आणि कार्यकर्ते टिकवून ठेवण्याचे राजकीय कौशल्य त्यांनी काकांकडून आत्मसात केले होते.


मिलिंद गड्डमवार
(मुक्त पत्रकार)
राजुरा जि. चंद्रपूर.
9511215200

प्रत्येक कार्यकर्त्याला नावाने ओळखण्याचे कसब त्यांच्या अंगी असल्याने ते कार्यकर्त्यांना आपलेसे करून घेत होते. यामुळे कार्यकर्ते हे मनाने जुळत असत. त्यांच्या सुख दुःखात ते सामिल होत असत. कठीण प्रसंगी रात्री अपरात्री धावून जाऊन सर्व ती मदत करीत असत. यामुळे त्यांना ' दादा ' ही पदवी कार्यकर्त्यांकडून प्राप्त झाली असावी.

पश्चिम महाराष्ट्रातील विकासातील त्यांचे योगदान हे महत्त्वपूर्ण ठरते आहे. त्यांनी तो भाग हरितमय करून टाकला. यामुळे उसाचे पीक बहरून त्या ठिकाणी साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले. यावर आधारीत इतर उद्योगांना चालना मिळून लोकांच्या हातांना काम मिळाले. दुध डेअरी प्रकल्पाची भरभराट होऊन तेथील लोकांच्या दरडोई उत्पन्नात भर पडली. याउलटचे चित्र मराठवाडा आणि विदर्भात पहायला मिळते आहे.

ते एकदा तहसील राजुऱ्याला आले होते. प्रसंग होता माजी आमदार सुदर्शन निमकर यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाचा! राजुरावासियांना त्यांचा भव्य प्रवेश सोहळा पहायला मिळाला. यानंतर त्यांना राष्ट्रवादी पक्षाचे सचिव पद पण बहाल करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते म्हणाले मी रस्त्याने येतांना मला एक मोठी नदी (वर्धा नदी) लागली. परंतु रस्त्याच्या काठाने कुठेही हिरवळ दिसली नाही. कुठलेही शेत हिरवेगार दिसले नाहीत. मग तुमच्या येथील आमदार काय करतात? त्यांना लोक निवडून कसे देतात? यावरून त्यांच्या स्पष्टपणाची आणि निर्भिडतेची जाणीव होते.

आमच्या येथील राज्यकर्ते फक्त स्वतःची घरे भरण्यात व्यस्त आहेत. त्यांना आपल्या कार्यकर्त्यांच्या, परिसरातील लोकांच्या प्रगतीशी काहीही देणेघेणे नाही, असे स्पष्टपणे दिसून येते आहे. याच कारणाने आमच्या विदर्भात मोठ्याप्रमाणावर कापूस व तेलवर्गीय पीकांचे उत्पादन होत असतांनाही सहकार क्षेत्र हे विस्तारलेले नाही. आज कापसाच्या जिनींग या खाजगी क्षेत्रातील लोकांच्या मालकीच्या आहेत.

याचा कुठलाही फायदा परिसरातील शेतकऱ्यांना होत नसल्याने आजही येथील कापूस उत्पादक शेतकरी हा कायमचा आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. पाणी भरपूर असूनही यांचा फायदा सिमेंट उद्योजक घेत आहेत.

शेतकऱ्यांच्या दुधाच्या उत्पादनात वाढ झालेली नाही. दुधावर आधारीत प्रक्रीया उद्योग हे बहरलेले नाहीत. तरीही येथील शेतकरी, मतदाता आणि नागरिक आपल्या लोकप्रतिनिधींना कुठलेही प्रश्न विचारून भांबावून सोडत नाहीत. मुकाट्याने पैसे घेऊन मते देऊन मोकळे होतांना आढळून येतात. मग विदर्भाचा विकास कसा होणार?

आजपर्यंत विदर्भात एकही सर्वमान्य लोकनेता उदयास आलेला नाही. याच्या कारणांचा शोध घेतला गेला पाहिजे. अजित पवारांचे गुणगान करतांना त्यांचे तील चांगल्या गुणांचा स्विकार करून ते अंमलात आणले गेले पाहिजेत. त्यांचेवर सुध्दा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचे आरोप झालेत. परंतु ते अनेक कारणाने सिध्द झालेले नाहीत, हा भाग वेगळा.

त्यांचेतील संघटन कौशल्य, माणुसकी, विकासाची दूर दृष्टी, सर्वांशी मिळवून घेण्याची प्रवृत्ती, अभ्यासू, खेळाडू वृत्ती आणि विनोदी स्वभाव जनतेला भुरळ पाडणारा आहे. जनतेचा, कार्यकर्त्यांचा, गावाच्या विकासाचा सतत ध्यास. सतत लोकोपयोगी कामे करण्या साठीची धडपड. यामुळे ते जगमान्य झालेत. लोकांचा त्यांच्या कामावर प्रचंड विश्वास होता. त्यांचा रोखठोक स्वभाव लोकांना, कार्यकर्त्यांना पसंद होता. म्हणून ते आपल्या भागातून सतत निवडून येत असत. त्यांचे कडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. दादांचा वकूब, रूबाब पाहून अधिकारी वर्ग त्यांना घाबरत असत. त्यांची कामे वेळेत होत असत. याच कारणाने ते खरे जनतेचे 'दादा' झालेत, हे लक्षात घ्यावे लागेल. त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली.

# स्वातंत्र्यवीरांचा वारसा जपणाऱ्या अरुण जोशी यांच्या कृतिशीलतेचा गौरव

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांची कृतिशीलता सिद्ध करणारी अशी संपूर्ण महाराष्ट्राला ओळख असणारे अरुण जोशी हे ३ फेब्रुवारी २०२६ या दिवशी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या समर्पित आणि कृतार्थ जीवनाची वाटचाल ही प्रत्येक राष्ट्रप्रेमींसाठी नक्कीच अनुकरणीय ठरणार आहे.



कॉलेजमध्ये शिकत असताना १९७२ पासून हिंदूमहासभेचे ज्येष्ठ नेते आणि हिंदूसंघटक विक्रमराव सावरकर यांच्यासोबत हिंदूमहासभेच्या माध्यमातून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे काम सुरू केले. यासाठी विविध कार्य करण्याबरोबरच निवडणूकांचे माध्यमदेखील अवलंबिले. यात प्रामुख्याने नागपूर महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा आदी निवडणुकांमधून हिंदूमहासभेचे कार्य पुढे नेले.

समान नागरी कायदा, श्रीराम जन्मभूमी निर्मिती, काश्मीरमध्ये ३७० कलम रद्द करणे आदी मुद्यांतून भविष्यात जनआंदोलने उभी राहिली. हिंदू संस्कृतीवर आधारित शैक्षणिक संस्था सुरू केल्या त्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी.

हे बघूनच विक्रमराव सावरकर यांनी त्यांच्यावर नागपूर नगर हिंदू महासभेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपविली. पुढे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदीही त्यांची निवड झाली.

त्यांच्या कार्याबद्दल त्यांना नुकताच नागपूर येथे विदर्भातील प्रतिष्ठेचा समजला जाणारा स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव पुरस्कार देऊन स्वातंत्र्यवीर सावरकर समितीच्या वतीने सन्मानित करण्यात आले. विक्रमरावांनी मुंबईच्या स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या अध्यक्षपदाचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. त्यावेळी प्रथमच त्यांनी स्मारकाचे कार्य देश-विदेशात नेले. सलग १२ वर्षे अध्यक्षपदी राहून त्यांनी विपुल कार्य केले.

यात अंदमान विमानतळाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देऊन तिथे पुतळा बसवणे, विविध राज्यांतील अभिलेख खात्यांकडून स्वातंत्र्यवीर सावरकरांची माहिती मिळवणे, लंडन येथील शासकीय संग्रहालयातून त्यांची दुर्मिळ चित्रफित, अंदमानात लिहलेल्या उर्दू गझलांचा ठेवा मिळवणे, सावरकर यांचे निवडक साहित्य १२ प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित तसेच ब्रेलमध्ये रुपांतरित करणे, अंदमानच्या कोठडीची प्रतिकृती, स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाची निर्मिती, भगूर येथील जन्मस्थान असलेला वाडा दत्तक घेणे, हे मृत्युंजय या अंदमान पर्वावर आधारित नाटकाचे प्रयोग राज्य आणि देशभर करणे, हम ही हमारे वाली है.. ही संगीतमय ध्वनीफित निर्माण करणे, ध्वनीफितीला अमिताभ बच्चन यांचे निवेदन अशा विविध कार्यामुळेच प्रेरणा घेत नवनिर्वाचित मंत्रिमंडळाला घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारकात येऊन स्वातंत्र्यवीरांना अभिवादन केले. बाबा रामदेवांपासून जगप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांसारख्या मंडळींचा वावर स्मारकात वाढू लागला.

दै. युगधर्म या हिंदी दैनिकाचे जोशी हे प्रबंध संपादक आहेतच . शिवाय विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातूनही त्यांनी शिक्षणाचा ज्ञानयज्ञ प्रज्वलित ठेवला आहे. शिशुवर्गापासून ते महाविद्यालयांपर्यंत अनेक शिक्षण संकुले त्यांच्या नावे नागपूर शहरात कार्यरत असून हजारो विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत.

प्रगत आणि सुनियंत्रित प्रशासन, नेतृत्वक्षमतेने परिपूर्ण असे त्यांचे व्यक्तिमत्व असून अनोखी शिस्त व कामाप्रती कमालीचे समर्पण त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांना अधिक प्रगल्भतेने सादर करण्यामुळेच अनेकांसाठी ते प्रेरणा आणि आशेचा स्त्रोत ठरले आहेत.

एका सर्जनशील व्यक्तिमत्वातून राष्ट्रभक्तीच्या विचारांच्या संस्कृतीला आधार देण्याचे कार्यदेखील त्यातून त्यांनी साध्य केले आहे. त्यांचा अमृतमहोत्सव हा येणाऱ्या काळात नव्या पिढीतील सावरकरप्रेमींना अनुकरणीय ठरणार आहे.

--------------

**रणजित विक्रम सावरकर**
**(स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू)**

# नात्यातून सामाजिक जाणीव जपणाऱ्या शिल्पा शेटे






mahasagarngp@gmail.com

आजचा काळ वेगाचा आहे, अविरत धावणारा, थांबायला नकार देणारा आहे. माणूस इतका गुंतला आहे की आजूबाजूला पाहण्याची सवडही त्याला उरत नाही. स्वतःपुरता विचार, स्वतःचा स्वार्थ आणि स्वतःचं सुरक्षित वर्तुळ याच्या पलीकडे जाणं जणू अशक्य झालं आहे.

अशा काळात कुणी थांबतं, कुणाचं दुःख ऐकतं, कुणासाठी हात पुढे करतं, तेव्हा ती व्यक्ती केवळ एक व्यक्ती राहत नाही; ती आधार बनते, आशा बनते, आणि हळूहळू प्रेरणा बनते. अशीच एक प्रेरणादायी आणि सेवाभावी काम करणारी व्यक्ती म्हणजे शिल्पा शेटे.

शिल्पा यांचे सासर बीड जिल्ह्यातले दिंद्रुड हे गाव. माहेर सोलापूर जिल्ह्यातले वैराग. शिल्पा शेटे यांचा प्रवास हा यशाचा आराखडा मांडणारा नाही, किंवा प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचा प्रयत्न करणारा नाही, तो आहे, माणसाशी माणूस म्हणून जोडणारा, वेदना समजून घेणारा आणि त्या वेदनांवर मायेची फुंकर घालणारा प्रवास आहे.

आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकी, या तीन मूल्यांच्या धाग्यांनी त्यांनी आपल्या कामाचं वस्त्र विणलं आहे. उद्योगाची कास धरणाऱ्या शिल्पा यांनी मराठवाडा आणि महाराष्ट्रात अनेकांच्या हाताला काम दिले, अनेकांना रोजगाराचे धडे दिले.

भाऊ नावाचे प्रेमळ नेटवर्क जे अत्यंत निस्वार्थीपणे काम करते, ते नेटवर्क त्यांनी राज्यभर उभे केले. त्या नेटवर्क च्या माध्यमातून आरोग्य ही संकल्पना शिल्पा यांच्या दृष्टीने केवळ औषधापुरती मर्यादित नाही. शिल्पा शेटे यांच्यासाठी आरोग्य म्हणजे रुग्णाच्या शरीराइतकंच त्याच्या मनाची काळजी घेणं.

आजारासोबत येणारी भीती, असुरक्षितता, एकटेपणा, हे सगळं त्या ओळखतात. आज जेव्हा रुग्णसेवा म्हणजे एक कोरडी यंत्रणा बनत चालली आहे, तेव्हा त्या त्या यंत्रणेत मानवी स्पर्श जिवंत ठेवतात.

बोलण्यातला मृदूपणा, ऐकून घेण्याची तयारी आणि तुम्ही एकटे नाही ही भावना, यातूनच त्यांची सेवा आकार घेते. अनेकांना त्यांनी त्यांच्या मदतीने गरीब, वंचित, दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचणं हे त्यांच्या कामाचं वैशिष्ट्य आहे.

गाव, तालुका, जिल्हा, शहर, असा कुठलाही भेद न ठेवता त्या माणसांपर्यंत पोहोचतात. कुणाच्या व्यथा ऐकतात, कुणाच्या प्रश्नांना संयमानं उत्तर देतात, तर कुणाला योग्य ठिकाणी जोडून देतात. कुठेही गाजावाजा नाही, कुठेही श्रेयाची अपेक्षा नाही, फक्त प्रामाणिक सेवा आणि माणुसकीची नाळ.

या सेवेतूनच शिल्पा शेटे यांनी राज्यभर नात्यांचं एक अदृश्य पण मजबूत जाळं विणलं आहे. आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्ते, सामाजिक संस्था, प्रशासनातील अधिकारी, स्वयंसेवक आणि सर्वसामान्य नागरिक, हे सगळे त्या जाळ्याचे घटक आहेत.

कुणाला मदतीची गरज असली, कुणी अडचणीत असलं, तर त्या जाळ्यातून योग्य माणूस, योग्य संस्था, योग्य दिशा मिळते. हा जाळा केवळ व्यवस्थेचा नाही, तर विश्वासाचा आहे.

अनेक वेळा प्रशासन, संस्था आणि सामान्य नागरिक यांच्यात दुरावा निर्माण होतो. त्या दरीतून संवादाचा पूल उभारण्याचं काम शिल्पा शेटे सातत्याने करतात.

त्यांच्या संवादात अधिकार नसतो, आग्रह असतो; आदेश नसतो, समजूत असते. त्यामुळेच कोणी तरी आपल्यासाठी आहे ही भावना अनेकांच्या मनात रुजते. आणि ही भावना निर्माण करणं, आजच्या काळातली सर्वात मोठी समाजसेवा आहे.

त्यांच्या कार्याकडे पाहताना स्त्री हा शब्द मुद्दाम पुढे येत नाही. कारण त्या केवळ स्त्री म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील, जबाबदार आणि सजग माणूस म्हणून समाजासमोर उभ्या राहतात.

अडचणी कितीही असोत, परिस्थिती कितीही प्रतिकूल असो, हार न मानता उभं राहणं, पुन्हा पुन्हा प्रयत्न करणं, हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे.

शिल्पाताई हे म्हणजे केवळ पुराणातील एक कथा सारखे पात्र नाही, तर जिवंतपणी माणुसकी जपणारी, दुसऱ्यासाठी लढणारी आणि समाजाला धरून ठेवणारी शक्ती.

आजच्या काळात शिल्पा शेटे यांच्यासारख्या व्यक्ती म्हणजेच आधुनिक मानवतावादी लढणाऱ्या जिजाऊ आहेत. ज्या समाजात आशा पेरतात, विश्वास जागवतात आणि माणसाला पुन्हा माणूस म्हणून जगायला शिकवतात.

अशा जिजाऊंचा आदर व्हायलाच हवा, त्यांच्या कामाचे पारायण होऊन ते काम दूरवर गेले पाहिजे. अशाच महिलांमुळे आपला समाज जिवंत राहत चांगुलपणा साठी पुढाकार घेतला जातो. अशाच महिलांमुळे माणुसकीवरचा विश्वास टिकून राहतो.

मंगल फलफले ह्या शिल्पा ताई यांच्या आई म्हणाल्या, माझी शिल्पा म्हणजे फक्त माझी मुलगी नाही, ती माझा श्वास आहे. तिच्या जन्मापासून आजपर्यंतचा प्रत्येक क्षण माझ्या डोळ्यांसमोर आहे. किती अडचणी आल्या, किती वेळा डोळ्यात पाणी आलं, पण तिने कधी हार मानली नाही. आज लोक तिचं काम पाहून कौतुक करतात, तेव्हा आई म्हणून माझं काळीज भरून येतं. हीच ती माझी लेक असं अभिमानाने सांगताना डोळे पाणावतात.

देवाने मला जेवढं दिलं, त्यातला सगळ्यात मोठा आशीर्वाद म्हणजे माझी शिल्पा. ती जिथे जाईल, तिथे माणुसकी, सचोटी आणि प्रेम घेऊन जाईल, याची मला खात्री आहे.

शिल्पा म्हणतात, माझ्यासाठी समाजकार्य म्हणजे मोठ्या घोषणा देणं नाही, तर समोरच्या माणसाचं दुःख शांतपणे ऐकून घेणं आहे. कुणी अडचणीत असेल तर त्याला योग्य माणसापर्यंत, योग्य ठिकाणी जोडून देणं, इतकंच मला जमलं पाहिजे, एवढीच माझी इच्छा आहे.

आरोग्य असो, शिक्षण असो किंवा सामाजिक प्रश्न, रोजगाराचा विषय असो प्रत्येक ठिकाणी माणुसकीचा धागा तुटू नये, यासाठी मी प्रयत्न करते. आज मदत करणारी माणसं नाहीत असं नाही, पण त्या मदतीला विश्वासाची जोड लागते.माणूस माणसाशी जोडला गेला, तरच समाज मजबूत होतो. मी काही वेगळं करत नाही, फक्त नात्यांची वीण घट्ट ठेवण्याचा प्रयत्न करते. हीच माझी भूमिका आहे आणि हीच माझी जबाबदारी.

शिल्पा शेटे यांचं कार्य हे केवळ आजपुरतं मर्यादित नाही; ते उद्याच्या समाजाचं बीज आहे, हे त्यांच्या कार्यावरून पुढे येते. शिल्पा यांच्या वाटचालीस मनापासून शुभेच्छा. नात्यांच्या, विश्वासाच्या आणि माणुसकीच्या या जाळ्याचा हा मानवतेचा जागर शिल्पा यांच्या रूपाने सतत होत राहो, हीच अपेक्षा

------------------

**शिल्पा शेटे संपर्क क्रमांक**
**9890706300**

# व्यसनाधीन तरुणाई : सशक्त राष्ट्र निर्माणात अडथळा!

**वाचक लिहितात**

दरवर्षी ४ फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिन साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश समाजात कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. कर्करोग हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. जगभरात दरवर्षी लाखो लोक या आजारामुळे मृत्युमुखी पडतात, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

कर्करोगाची अनेक कारणे असली तरी व्यसन हे कर्करोगाचे एक प्रमुख कारण आहे. तंबाखू, सिगारेट, गुटखा, खैनी, हुक्का, ई-सिगारेट, दारू तसेच विविध अमली पदार्थांचे सेवन केल्यामुळे तोंडाचा, फुफ्फुसांचा, घशाचा, यकृताचा इत्यादी कर्करोग होण्याचा धोका प्रचंड वाढतो.

आजची भयावह वास्तविकता अशी आहे की, तरुण वर्ग (तरुण आणि तरुणी) मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या आहारी जात आहे. किशोरवयापासूनच मुलांना व्यसनांची सवय लागत असल्यामुळे त्याचे दुष्परिणाम लवकर आणि अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. केवळ क्षणिक आनंदासाठी ओढलेली सिगारेट पुढे जाऊन व्यसनात रूपांतरित होते आणि आयुष्यभराचा आजार देऊन जाते, ही वास्तविकता आहे. ताणतणावातून पळ काढण्याची वृत्ती, चुकीची फॅशन, मित्रांचा दबाव, पालकांचे दुर्लक्ष तसेच समाजातील चुकीचे आदर्श ही व्यसनाधिनतेची प्रमुख कारणे आहेत. यामुळे अनेक तरुणांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत आहे.

आजचा तरुण वर्ग जर व्यसनांच्या आहारी जाऊन भरकटत असेल, तर देशाच्या भविष्याचे काय होणार? अत्यंत गंभीर असा हा प्रश्न आहे. एक पालक, शिक्षक आणि जबाबदार नागरिक म्हणून आपण किती सजग आहोत, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकांनी करायला हवे. या दिवसाच्या निमित्ताने तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याची, सकारात्मक विचारसरणी स्वीकारण्याची आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याची शपथ घेऊन त्यानुसार कृती करायला हवी. सुदृढ तरुणाईच सशक्त राष्ट्राची खरी ताकद आहे. म्हणूनच व्यसनमुक्त तरुण आणि निरोगी समाज घडवणे ही काळाची गरज आहे.

**■ सौ. वर्षा आवदे**
**नागपूर.**

# हिवाळ्यात त्वचेला तूप लावल्यामुळे नेमकं काय होते?



हिवाळ्यात त्वचा खराब होण्यामागे हवामानातील बदल हे मुख्य कारण असते. या ऋतूमध्ये हवेतली आर्द्रता खूप कमी होते, त्यामुळे त्वचेतील नैसर्गिक ओलावा झपाट्याने कमी होतो आणि त्वचा कोरडी, खरबरीत व निस्तेज दिसू लागते. थंड वारे आणि कमी तापमानामुळे त्वचेतील रक्ताभिसरण मंदावते, ज्यामुळे त्वचेला आवश्यक पोषण कमी प्रमाणात मिळते.

याशिवाय हिवाळ्यात गरम पाण्याने अंघोळ करण्याची सवय वाढते, ज्यामुळे त्वचेवरील नैसर्गिक तेल निघून जाते आणि कोरडेपणा अधिक वाढतो. घरातील हीटर किंवा गरम हवा देणारी उपकरणे वातावरण आणखी कोरडे करतात, याचा थेट परिणाम त्वचेवर होतो. पुरेसे पाणी न पिणे, फळे व हिरव्या भाज्यांचे सेवन कमी होणे आणि जीवनसत्त्व अ, ए व ओमेगा-३ फॅटी ॲसिडची कमतरता यामुळे त्वचा कमकुवत होते.

साबण, फेसवॉश किंवा सौंदर्यप्रसाधनांमधील कडक रसायने त्वचेची नैसर्गिक संरक्षण क्षमता कमी करतात, त्यामुळे त्वचेवर खाज, लालसरपणा, भेगा पडणे आणि पिंपल्ससारख्या समस्या वाढतात. योग्य काळजी न घेतल्यास हिवाळ्यात त्वचा लवकर खराब होते, म्हणून या काळात नियमित मॉइश्चरायझरचा वापर, कोमट पाण्याने अंघोळ आणि संतुलित आहार घेणे अत्यंत आवश्यक ठरते. थंडीच्या ऋतूत त्वचेची काळजी घेणे खूप गरजेचे असते. थंडीत त्वचा कोरडी, निर्जीव आणि खाज सुटते, कारण थंड हवा आणि उष्णतेमुळे ओलावा कमी होतो, म्हणून त्वचेला योग्य प्रकारे मॉइश्चराइझ करणे खूप महत्वाचे आहे.

तथापि, त्वचेसाठी जुने घरगुती उपचार आजच्या महागड्या स्किनकेअर उत्पादनांपेक्षा अधिक प्रभावी असल्याचे सिद्ध होते. खरं तर, खरा हिवाळी त्वचेचा सुपरहिरो आमच्या स्वयंपाकघरात शांतपणे आहे, जो शुद्ध देसी गाईचे तूप आहे. जेव्हा थंड, कोरड्या हवेमुळे त्वचेचा नैसर्गिक ओलावा कमी होऊ लागतो, तेव्हा तूप आराम करण्याचे, भरण्याचे आणि त्वचेवर चमक परत आणण्याचे कार्य करते.

हेल्थलाइनच्या अहवालानुसार, तुपाचा विशिष्ट वापर पारंपारिकपणे कोरड्या, क्रॅक, संवेदनशील त्वचेसाठी सुरक्षित मानला गेला आहे, जरी वैज्ञानिक डेटा मर्यादित आहे. त्याचे गुणधर्म लिप बाम, कोरडे ठिपके आणि हिवाळ्यातील त्वचेसाठी खूप प्रभावी बनवतात. तूप पोतमध्ये खूप समृद्ध आणि तेलकट आहे, म्हणून मुरुम-प्रवण त्वचेवर छिद्र अवरोधित होण्याची शक्यता वाढू शकते.

तूप वृद्धत्व विरोधी आणि मुक्त-मूलीक संरक्षणात उपयोगी आहे. थंड हवा, कमी आर्द्रता, गरम पाण्यातील आंघोळ आणि रूम हीटर या सर्व गोष्टींमुळे त्वचा कोरडी आणि तणावपूर्ण होते, बाजारात उपलब्ध असलेले बरेच मॉइश्चरायझर्स केवळ वरचा थर मऊ करतात, परंतु तूप त्वचेचा अडथळा थर मजबूत करते.

तुपात आढळणारी जीवनसत्त्वे अ, डी, ई आणि के तसेच नैसर्गिक फॅटी ॲसिड त्वचेचे सखोल पोषण करतात. तुपाचा वापर फाटलेले ओठ, मुलांचा मसाज आणि आजारपणानंतर त्वचेच्या पुनर्प्राप्तीसाठी केला जात आहे. त्वचेवर तूप लावल्याने ते खोलवर मॉइश्चराइझ होते, ओलावा टिकवून ठेवते आणि कोरडी त्वचा मऊ होते, ज्यामुळे त्वचा हायड्रेटेड आणि चमकदार होते.

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### अंदर की बात ..!

दिसते तसे नसते
म्हणून जग फसते
लोकशाहीतही -
घराणेशाहीचे वर्चस्व असते ..

खेकड्यासम वृत्ती आमची
जाऊ देत नाही कुणाला वर
गुलामीची सवय झाली
म्हणून मुकसंमतीवर भर . .

कुटूंब आमचं एकच
पण क्रॉसकट स्पर्धाआहे
पडद्या मागचं राजकारण
मात्र थोडं वेगळं आहे..!

# प्रवाशांच्या मागण्या मान्य

## प्रहारच्या आंदोलनाला यश ■ मोझरी बसस्थानक येथे केले आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.2 )-** तिवसा तालुक्यातील मोझरी बसस्थानकावरील प्रवाशांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवारी उपोषण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, प्रशासनाने प्रवाशांच्या चार प्रमुख मागण्या तात्काळ मान्य केल्याने आंदोलनाला यश आले

तिवसा तालुक्यातील मोझरी येथील मुख्य सलगङ्कमोझरी



बसस्थानकावर प्रवाशांच्या विविध समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवार, 2 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता उपोषण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला शाळकरी विद्यार्थी, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बससेवेअभावी प्रवाशांना होत असलेल्या गैरसोयींबाबत प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते संजय देशमुख यांनी परिवहन महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी रायलवार यांच्यासमोर प्रवाशांच्या पाच प्रमुख मागण्या मांडल्या. यावेळी रायलवार यांनी प्रत्यक्ष स्थळी उपस्थित राहून प्रवाशांच्या अडचणी समजून घेतल्या. मांडण्यात आलेल्या मागण्यांपैकी चार मागण्या तात्काळ पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केल्याने उपस्थित प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. यावेळी तिवसा तालुका प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते संजय देशमुख, योगेश लोखंडे, मोझरी सरपंच सुरेंद्र भिवगडे, गौरी देशमुख यांच्यासह परिवहन महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी रायलवार, सहाय्यक वाहतूक अधीक्षक गोडे, सुरक्षा दक्षता विभागाचे राजकुमार वाघमारे उपस्थित होते. तसेच प्रेमराज कांडलकर, पोलिस पाटील दिनेश इंगोले, भास्कर वडनेकर, सागर डेहनकर, मनीष कान्हे, समीर लांडगे, नरेंद्र काकडे, संदेश चतुर, अरविंदराव निस्ताने, कृष्णा पिडेकर, अतुल निस्ताने, सुनील पाटील यांच्यासह महिला, पुरुष व शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ....अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष जनतेसह रस्त्यावर उतरेल

मोझरीसारख्या जागतिक ओळखीच्या गावात आणि शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर तिवसा तालुक्यात महामंडळाच्या बसेस न थांबणे हा जाणीवपूर्वक केलेला अन्याय आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून खोटी कारणे सांगून प्रवाशांना वेठीस धरणे ही मुजोरी खपवून घेतली जाणार नाही विद्यार्थी, शेतकरी व कामगारांच्या अडचणींकडे प्रशासन डोळेझाक करत आहे.महामंडळाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करून नियमित बस थांबा सुरू करावा अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष जनतेसह रस्त्यावर उतरेल, याची जबाबदारांनी नोंद घ्यावी.

**-संजय देशमुख, नेते, प्रहार जनशक्ती पक्ष**

# पर्यटकांना निसर्गाशी थेट एकरूप करा!

## 'ट्रॅक ॲण्ड ट्रेल'च्या माध्यमातून पर्यटन विकास साधण्याचे आवाहन






### पायदळ भ्रमंतीचे मार्ग विकसित करा!

पर्यटकांसाठी सवलती व आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्यास मेळघाटाकडे त्यांचा कल वाढेल. धबधबे, ऐतिहासिक स्थळे केंद्रस्थानी ठेवून पायी भ्रमंतीसाठी मार्ग विकसित करावेत. या मार्गांवर नाश्ता व जेवणाची सोय केल्यास पर्यटकांसाठी अधिक आकर्षक अनुभव निर्माण होईल. वन विभागाने निवासासोबतच सुरक्षित जंगल भ्रमंतीसाठी योग्य मार्ग शोधावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - मेळघाट हे निसर्गसंपन्न व जैवविविधतेने नटलेले क्षेत्र असून येथे निसर्गसौंदर्याचा अनुभव घेण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक येतात. मात्र, केवळ पर्यटनस्थळांपुरते मर्यादित न राहता पर्यटकांना जंगल भ्रमंती व निसर्गाशी थेट एकरूप होण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी 'ट्रॅक ?ण्ड ट्रेल'च्या माध्यमातून योग्य मार्ग विकसित करून मेळघाटातील पर्यटनाचा सर्वांगीण विकास साधण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

मेळघाट ॲडव्हेंचर क्लबच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात मेळघाट पर्यटनासंदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. विदर्भातील वन पर्यटनामध्ये मेळघाट हा अत्यंत महत्त्वाचा व आकर्षक पर्याय असल्याचे नमूद करत, पर्यटनस्थळांच्या विकासासोबतच जंगल सफारी, साहसी पर्यटन व नियंत्रित जंगल भ्रमंतीसारखे पर्याय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वन विभागाने ट्रेकिंगसाठी योग्य मार्ग निश्चित करावेत. गरज भासल्यास स्वतंत्र प्रवेशद्वार उभारण्याचाही विचार करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. मेळघाट पर्यटनाचा प्रचार युवकांना लक्षात घेऊन समाजमाध्यमांद्वारे करावा. तसेच शालेय विद्यार्थी व समूहाने येणाऱ्या पर्यटकांसाठी निवास, भोजन व भ्रमंतीची दर्जेदार व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सेमाडोह व कोलकास येथील निवासस्थांची नियमित देखभाल व दुरुस्ती करावी. इतर ठिकाणी तंबूंमधून (टेंट) निवासाची सुविधा देण्याचा पर्यायही तपासावा. आमझरी येथे उपलब्ध साहसी खेळांच्या सुविधांचे प्रभावी नियोजन करून पर्यटकांना आकर्षित करावे, असेही त्यांनी नमूद केले.

### भूमी अभिलेख कार्यालयामार्फत तालुकास्तरावर जनता दरबार

**अमरावती** - अमरावती जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाचा आढावा घेऊन प्रशासकीय सुसूत्रता वाढविण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत तालुकास्तरावर जनता दरबाराचे आयोजन करण्यात येणार आहे. या दौऱ्यादरम्यान जमीन मोजणी, नगर भूमापन, एकत्रिकरण आदी विषयांवरील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार असून संबंधित कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. जाहीर वेळापत्रकानुसार, 5 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी चांदूर रेल्वे व दुपारी तिवसा, 6 फेब्रुवारी रोजी नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे, तर 9 फेब्रुवारी रोजी अमरावती मुख्यालय व भातकुली येथे जनता दरबार होणार आहे. पुढील टप्प्यात 12 फेब्रुवारी मोर्शी व वरूड, 13 फेब्रुवारी चांदूर बाजार व अचलपूर, 16 फेब्रुवारी दर्यापूर व अंजनगाव येथे दौरा होईल. 20 फेब्रुवारी चिखलदरा व 23 फेब्रुवारी धारणी येथे दौऱ्याचा समारोप होणार आहे.



# महात्मा फुले हायस्कूल येथे प्रजासत्ताक दिन

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि. 2 )-** येथील सर्वोदय शिक्षण समिती संचलित महात्मा फुले हायस्कूल, महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय व गंगाबाई सीतारामजी चौधरी कन्या हायस्कूल येथे भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 76 वा वर्धापन दिन देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सोमवार, 26 जानेवारी 2026 रोजी सकाळी ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. या सोहळ्यास अशोकराव गुलाबराव गहूकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय भिकमचंद तापडिया होते, तर प्रमुख उपस्थितीत भास्कर शामराव मोकलकर लाभले. संविधानाने दिलेले अधिकार, कर्तव्ये, स्वातंर्त्य, समानता व बंधुता या मूल्यांचे महत्त्व मान्यवरांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. किशोर गहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.सी.सी. संचलन सादर करण्यात आले. देशभक्तीपर गीत, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्य नंदा थोरात, मुख्याध्यापिका संजया टाक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजी नगरसेवक आबिद हुसेन यांचे निधन

**अचलपूर—** शहरातील रहिवासी व माजी नगरसेवक आबिद हुसेन गुल हुसेन यांचे आकस्मिक निधन झाल्याने शहरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, मित्रपरिवार व नागरिकांना मोठा धक्का बसला आहे. ते माजी नगरसेवक तसेच नगराध्यक्षपदाचे उमेदवार शाकिर हुसेन यांचे ज्येष्ठ बंधू होते.



रविवारी दुपारी 2.30 वाजता जनाजाची नमाज अदा करून अब्दुल रहमान गाजी (रह.) यांच्या आस्तान्याजवळील कब्रस्तानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश मार्गदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )-** आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्यावतीने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. शासकीय, अनुदानित तसेच एकलव्य मॉडेल शाळांमध्ये इयत्ता दहावी व बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित खासगी प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून नीट, सीईटी व जेईई परीक्षांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे.

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेले तसेच मार्च 2026 मध्ये दहावीची परीक्षा देणारे विद्यार्थी या योजनेस पात्र असतील. इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शाळेमार्फत 15 फेब्रुवारीपर्यंत धारणी प्रकल्प कार्यालयात सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी धारणी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा.

# 'पीसीबी डिझायनिंग' वर कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )-** इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी क्षेत्रात प्रिंटेड सर्किट बोर्ड (पीसीबी) डिझायनिंगचे व्यावहारिक ज्ञान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ही गरज लक्षात घेऊन येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे 'पीसीबी डिझायनिंग' विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पीसीबीसाठी आवश्यक मूलभूत साहित्य, विविध इलेक्ट्रॉनिक्स घटक व त्यांची वैशिष्ट्ये, तसेच आधुनिक सॉफ्टवेअरच्या साहाय्याने स्किमॅटिक व लेआउट डिझाइन कसे करावे याची सविस्तर माहिती देण्यात आली. यासोबतच 'हँड्स-ऑन' प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्यक्ष



काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. स्मार्टफोन, वैद्यकीय उपकरणे, ऑटोमोटिव्ह व दूरसंचार क्षेत्रात पीसीबीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमात तृतीय वर्षातील 70 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विभागप्रमुख पी. आर. देशमुख यांनी अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थी उद्योगांच्या गरजांनुसार सक्षम होत असल्याचे नमूद केले.

# सावनेर येथे भव्य भागवत व व्यसनमुक्ती सप्ताहाचे आयोजन

## 62 वर्षांची परंपरा कायम

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि. 2 )** - नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तीर्थक्षेत्र सावनेर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत वामन महाराज संस्थानच्या वतीने भव्य श्रीमद् भागवत तसेच व्यसनमुक्ती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची 62 वर्षांची परंपरा असून, बुधवार दि. 4 फेब्रुवारीपासून या सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात हरिपाठ, किर्तन, भजन व विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




दररोज दुपारी 1 ते 4 या वेळेत भागवत कथा प्रवक्ता योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ महाराज (आळंदी) यांच्या अमृततुल्य वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे वाचन होणार आहे. कथेसोबतच व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करत व्यसनमुक्त जीवन व भक्तीमय जीवनाचा संदेश दिला जाणार आहे. संगीतमय भागवतासाठी ह.भ.प. अनंतराव महाराज अरबट (गायक), ह.भ.प. आदित्य महाराज (मृदंगाचार्य) व सुधाकर महाराज बोबटकर (ऑर्गन) साथसंगत करणार आहेत. सकाळी 8 ते 10 या वेळेत नामवंत कीर्तनकारांची किर्तने आयोजित करण्यात आली असून, दि. 11 फेब्रुवारी 2026 रोजी भव्य यात्रा व महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. या सप्ताहाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष संत सच्चिदानंद बाल वामन महाराज यांनी केले आहे.

# शेकडो लाडक्या बहिणींची तहसील, बालविकास कार्यालयावर धडक

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.2 )** - मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत तालुक्यातील सुमारे चार हजार लाभार्थींना नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांचे हप्ते न मिळाल्याने शेकडो लाडक्या बहिणींनी संतप्त होत तहसील कार्यालय व बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयावर धडक दिली. शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. संतप्त महिलांनी तहसीलदार व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना घेराव घालून प्रलंबित हप्ते तात्काळ देण्याची मागणी केली.



आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, अनेक महिलांनी ई-केवायसी पूर्ण करूनही अद्याप लाभ मिळालेला नाही. तसेच तांत्रिक अडचणी व किचकट प्रश्नांमुळे शेकडो महिलांचे ई-केवायसी अपूर्ण राहिले आहे. शासनाने योजनेचे ऑनलाइन पोर्टल बंद केल्याने नवीन अर्जही करता येत नाहीत. पात्र-अपात्रतेबाबत स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांमार्फत महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना सादर करण्यात आले. 15 दिवसांत पोर्टल सुरू करून ई-केवायसी व त्रुटी दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून प्रलंबित हप्ते जमा न झाल्यास तीव्र आंदोलन व रास्ता रोको करण्याचा इशारा प्रकाश मारोटकर यांनी दिला. आंदोलनात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक व मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

# चांदूर रेल्वे शहरात लोकनेते स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांची जयंती



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.2 )** - शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व वंचित घटकांचे कैवारी, ओबीसी शिष्यवृत्तीचे शिल्पकार आणि जनता दल (सेक्युलर) पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष तसेच चांदूर रेल्वेचे माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांची जयंती सोमवारी (दि. 2) चांदूर रेल्वे शहरात साजरी करण्यात आली. स्व. डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच व मित्रपरिवाराच्या वतीने ढोले कॉम्प्लेक्स येथील विचारमंच कार्यालयात हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आम आदमी पार्टीचे नेते व नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन गवळी होते. डॉ. क्रांतिसागर ढोले, डॉ. अनुया ढोले व नितीन गवळी यांनी स्व. डॉ. ढोले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. डॉ. ढोले हे केवळ व्यक्ती नव्हते, तर एक विचार होते. शेतकरी व कष्टकरी वर्गासाठी त्यांनी केलेला संघर्ष आजही प्रेरणादायी असल्याचे मनोगतातून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्तमराव पडोळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय डगवार यांनी केले.

# साहेब, तुमची निवडणूक झाली...पण आमच्या समस्या सुटणार का?

## नांदगाव खंडेश्वरमधील नागरिकांचा थेट सवाल




**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर( दि.2 )-** नगर पंचायत निवडणुकीची धामधूम संपली, नवे नगरसेवक निवडून आले आणि सत्तास्थानेही निश्चित झाली. मात्र सत्ता कोणाचीही असो, आमच्यासमोरील प्रश्न मात्र 'जैसे थे'च राहतात, असा संतप्त सूर नांदगाव खंडेश्वर शहरातील नागरिकांतून उमटत आहे. निवडणूक काळात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, क्रीडांगणे, उद्याने, सभागृहे यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर मोठमोठी आश्वासने देण्यात आली. आता ही आश्वासने प्रत्यक्षात उतरतील की हवेत विरतील, याबाबत मतदार साशंक आहेत.

सध्या शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून कचराकुंड्यांचा अभाव, नाल्यांची साफसफाई न होणे आणि सांडपाणी रस्त्यावर साचणे यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढत असून आजारांचे प्रमाणही वाढत आहे.

सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था दयनीय असल्याने नागरिक त्यांचा वापर टाळत आहेत. अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद झाले असून वाहतुकीची कोंडी नित्याची झाली आहे. निवडणूक संपली, सत्ता स्थापन झाली; आता केवळ राजकारण नव्हे तर प्रत्यक्ष काम करून दाखवण्याची वेळ आली आहे. साहेब, तुमची निवडणूक झालीज पण आमच्या समस्या आता तरी सोडवा, अशी अपेक्षा व्यक्त करत नांदगाव खंडेश्वरचे नागरिक नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून ठोस कृतीची वाट पाहत आहेत.

### पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न विशेषत: महिलांसाठी गंभीर ठरत आहे. आठवड्यातून एकदाच होणारा पाणीपुरवठा अपुरा असून किमान दोन वेळा पाणी देण्याची मागणी होत आहे. शहरांतर्गत रस्त्यांवरील खड्डयांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. बसस्थानक परिसरात ट्रॅफिक सिग्नल व महत्त्वाच्या चौकात हायमास्ट दिव्यांची आवश्यकता नागरिक व्यक्त करत आहेत.

### भटके कुत्रे, मोकाट जनावरांचा उपद्रव

भटके कुत्रे व मोकाट जनावरांचा उपद्रव वाढला असून लहान मुले, वृद्ध व महिलांसाठी तो धोकादायक ठरत आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहरात मैदान, सभागृह, वाचनालये व उद्याने अपुरी आहेत.

# शिवर बु. ग्रामपंचायतीचा विकास टक्केवारीसाठी रखडला

## ग्रामपंचायत सदस्य पंकज कदम यांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.2 )-** तालुक्यातील शिवर बु. ग्रामपंचायतीतील विकास कामे टक्केवारीच्या अडथळ्यामुळे रखडल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य पंकज कदम यांनी केला आहे. ग्रामपंचायत शिवर येथे मागील पाच महिन्यांपासून अनुसूचित जातीङ्कनवबौद्ध घटक वस्ती सुधार (दलित वस्ती) योजनेंतर्गत 13 लाख रुपयांचा निधी मंजूर असतानाही अद्याप कोणतीही निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. कदम यांनी सांगितले की, आचारसंहिता लागू होण्यापूर्वी व ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपण्याआधी 13 ऑक्टोबर 2025 रोजी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना निविदा काढण्याबाबत लेखी पत्र देण्यात आले होते. तसेच वेळोवेळी तोंडी पाठपुरावा व प्रत्येक मासिक सभेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. 12 जानेवारी 2026 रोजी निविदा ऑनलाइन केल्याची तोंडी माहिती देण्यात आली; मात्र लेखी अर्ज करूनही पंधरा दिवस उलटून माहिती देण्यात आलेली नाही.



यावरून ग्रामपंचायतीत निविदा टक्केवारीसाठी मुद्दाम विलंब केला जात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. याशिवाय सरपंचांचा मनमानी कारभार सुरू असून, नियमबाह्य ठराव, मासिक सभेत पत्र न ठेवता परस्पर निर्णय, वाणिज्य प्रयोजनासाठी नियमबाह्य 'ना हरकत' पत्र देणे, कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसणे व 26 जानेवारी रोजी ग्रामसभा न घेणे अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व नियमबाह्य कृत्यांमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय असून, संबंधित सरपंचांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी.

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# कॉर्न आलू मसाला चाट

एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री :** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती :** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद,



झटपट रेसिपी

धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.

# जोश

## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

# पिठाचा गिरणी चालक ते ब्रँड निर्माता

आरा येथील पसापियानिया गावातील जयहिंद तिवारी यांचे नाव वेगळे आहे. जयहिंद तिवारी आणि त्यांची पत्नी जिग्यासा हे आपल्या लहान व्यवसायाचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्यासाठी एकत्र काम करत आहेत. सुरुवातीला ते घरी फक्त एक पिठाची गिरणी चालवत होते; परंतु हळूहळू सत्तू आणि बेसन बनवण्यासाठी मशीन बसवून त्यांचा व्यवसाय वाढवला. आता ते कच्चे मसाले मिळवतात, ते दळतात. ते स्वतः पॅक करतात आणि बाजारात विकतात. त्यामुळे त्यांचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढले आहे.

जयहिंद तिवारी यांना उद्योग विभागाकडून एक छोटेसे कर्ज मिळाले. त्यानंतर त्यांनी १० ते १५ लाख रुपये जमवले आणि यंत्रसामग्री खरेदी केली. उल्लेखनीय म्हणजे, त्यांनी त्यांचे संपूर्ण घर आणि व्यवसाय सौर यंत्रणेशी जोडले आहे. ते स्वतःची वीज निर्माण करतात आणि उद्योगात वापरतात, तसेच घरी काही सौरऊर्जादेखील वापरतात. ते पीठ, सत्तू,



बेसन आणि मसाल्यांचा व्यवसाय करतात. यातून त्यांना दरमहा पन्नास ते साठ हजार रुपये मिळतात. त्यांची पत्नी जिग्यासादेखील त्यांना मदत करते. जिग्यासा पूर्वी गृहिणी होती आणि केवळ घरकामांवर लक्ष केंद्रित करत होती; परंतु आता ती तिच्या पतीसोबत व्यवसाय सांभाळते.


जिग्यासाने २०२२ मध्ये उद्योग विभागाकडून चार लाख रुपयांचे कर्ज घेतले. पीठ, सत्तू, बेसन आणि मसाले तयार करण्याचा व्यवसाय सुरू करून, ती दरमहा अडीच ते तीन लाख रुपयांची विक्री करते. जयहिंद तिवारी या व्यवसायात आणखी दोघांसोबत काम करतात. ते मार्केटींगकडे लक्ष देतात, तर इतर दोघे कारखान्यात काम करतात. त्यांनी स्पष्ट केले, की तिच्या उत्पादनांची मागणी वाढत आहे. सध्या जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये तिच्या सत्तू, बेसन आणि मसाल्यांची मागणी आहे. तो व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढवण्याची इच्छा बाळगतो. एका कल्पनेने त्याचे नशीब बदलले. आता त्याला बिहारच्या विविध भागांमधून विविध प्रकारच्या मसाल्यांच्या ऑर्डर मिळतात. स्थानिक बाजारपेठेत मसाले विकून तो चांगला नफा कमावत आहे. त्याने आपल्या मुलीच्या नावाने एक ब्रँडदेखील नोंदणीकृत केला आहे. तो त्याचे

अचिव्हर

मसाले, सत्तू आणि बेसन यांचे ब्रँडिंग करून आपला व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढवण्याची योजना आखत आहे.

## वेगळ्या वाटा

### क्षेत्र सॉईल सायन्सचं



विज्ञानाची विविध अंग आहेत. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र,समुद्रशास्त्र,भूगर्भशास्त्र याप्रमाणे सॉईल सायन्स म्हणजे मृत्तिका विज्ञान हे सुद्धा विज्ञानाचं एक अंग आहे. यात नावाप्रमाणे मातीचा अभ्यास केला जातो. या शास्त्रात मातीकडे नैसर्गिक स्त्रोत म्हणून पाहिलं जातं. या शास्त्रात मातीची निर्मिती, वर्गीकरण, मातीचे जैविक, रासायनिक आणि भौतिक गुणधर्म तसंच तिच्या उपयुक्ततेविषयी माहिती मिळवली जाते.

आपल्या देशात मातीची चाचणी आणि संशोधनासाठी प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. मातीचा दर्जा तपासण्यासोबतच इतर कामांसाठीही तज्ज्ञांची गरज लागते. म्हणूनच आज या क्षेत्रातही नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. राज्य आणि केंद्र सरकारच्या कृषी विभागातही या तज्ज्ञांची गरज असते.

विविध महाविद्यालयं आणि विद्यापीठांमध्ये सॉईल सायन्सचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यात पदवी तसंच मास्टर्स करता येईल. यासोबतच सॉईल फॉर्मेशन,सॉईल क्लासिफिकेशन, सॉईल सर्व्हे, सॉईल मिनरोलॉजी, सॉईल बायोलॉजी असे बरेच अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तुम्ही या क्षेत्रात संशोधनही करू शकता.

## ग्रूमिंग

### टिकवा केसांची चमक



दोस्तांनो, तुम्हीही वेगवेगळ्या हेअरस्टाईल करत असाल. आपली हेअरस्टाईल  चांगली दिसावी असं तुम्हालाही वाटत असेल. मात्र यासाठी केसांची काळजी घ्यायला हवी. केस छोटे असले म्हणून काय झालं त्यांच्याकडे लक्ष द्यायलाच हवं. केसांची चमक टिकून रहावी आणि कोणतीही हेअरस्टाईल चांगली दिसावी, यासाठी काय करता येईल याविषयी...

* बरीच मुलं रोज केस धुतात. काही मुलं केसांना साबण लावतात. पण असं केल्याने केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. केसांच्या मुळाशी असलेल्या तेलामुळे केसांमधला ओलावा टिकून रहातो. दररोज केस धुतल्याने हे तेल नष्ट होतं आणि केस कोरडे होतात. त्यामुळे आठवड्यातून तीन वेळा केस धुवा.
* केसांसाठी कोणताही शँपू वापरून चालणार नाही. नैसर्गिक घटकांनी युक्त शँपू वापरणं योग्य ठरतं. तुमचा शँपू सल्फेट आणि पॅराबेन फ्री असावा.
* कंडिशनरचा वापर टाळू नका. कंडिशनरमुळे केसांना ओलावा मिळतो. केस छान मुलायम होतात.
* आठवड्यातून एकदा केसांना तेल लावा. यामुळे केसांमधला ओलावा टिकून राहिल. कुरळे केस असणाऱ्या मुलांनी नियमित तेल लावायला हवं.
* आपण घाईगडबडीत जोरात केस पुसतो. यामुळे केस गळू लागतात.

# अर्थशास्त्र आणि सांख्यिकी

अर्थशास्त्र (इकॉनॉमिक्स) आणि सांख्यिकी (स्टॅटिस्टिक्स) हे दोन विषय करिअरसाठी महत्त्वपूर्ण ठरतात. दोन्ही विषय परस्परांशी निगडित असले, तरी त्यांच्या अभ्यासक्रमातील दृष्टिकोन, संधी आणि कौशल्ये यात फरक दिसून येतो. अर्थशास्त्र हा विषय समाजातील संसाधनांचा वापर, उत्पादन, वितरण आणि मागणी-पुरवठ्याच्या सिद्धांतांवर आधारित असतो. यात आर्थिक धोरणे, उद्योगधंदे, बाजारपेठ, वित्तीय संस्था व सरकारी निर्णयांचा अभ्यास होतो. सांख्यिकी विषय आकडेवारीवर आधारित असून त्यात डेटाचे संकलन, विश्लेषण, निष्कर्ष काढणे आणि भविष्यातील अंदाज मांडणे यावर भर दिला जातो.

साधारणपणे अर्थशास्त्र हे तत्त्वज्ञान आणि धोरणात्मक विश्लेषणावर केंद्रित असते, तर सांख्यिकी हे गणितीय आणि तांत्रिक पद्धतींवर आधारित असते. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.ए. किंवा बीएस्सी (अर्थशास्त्र) किंवा बीएस्सी. (सांख्यिकी) हा अभ्यासक्रम निवडता येतो. बारावीनंतर प्रवेशासाठी गणित किंवा सांख्यिकी विषय घेतले असल्यास अधिक फायदा होतो. पुढे पदव्युत्तर, संशोधन किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम यासाठी हे दोन्ही विषय पायाभूत ठरतात. आर्थिक चढ-उतार, बाजारपेठेतील बदल, शासन धोरणे याबाबत रस असणाऱ्यांनी अर्थशास्त्र निवडावे तर गणित, डेटाचे विश्लेषण, संशोधन, सॉफ्टवेअर यामध्ये प्रावीण्य असणाऱ्यांनी सांख्यिकीचा अभ्यासक्रम निवडावा. अर्थशास्त्र शिकलेल्या विद्यार्थ्यांना बँका, वित्तीय संस्था, सरकारी सेवा, आंतरराष्ट्रीय संस्था, संशोधन संस्था, उद्योगधंदे, कॉर्पोरेट क्षेत्र तसेच अध्यापन क्षेत्रात करिअर करता येते. सांख्यिकी शिकलेल्यांना विमा कंपन्या, आयटी,



करीअरवेध

डेटा सायन्स, मार्केट रिसर्च, जनगणना विभाग, कृषी व आरोग्य संशोधन, औषधनिर्मिती उद्योग तसेच बिग डेटा ॲनॅलिसिस क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत.

बारावीमध्ये गणित, सांख्यिकी किंवा वाणिज्य विषय घेणारे विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र असतात. सीयूईटी किंवा विद्यापीठ स्तरावरील प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश दिला जातो. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संबंधित पदवी आवश्यक असते. अर्थशास्त्रासाठी बी.ए. अर्थशास्त्र, एम.ए. अर्थशास्त्र, एम.फिल., पीएच.डी. तसेच आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, विकास अर्थशास्त्र, वित्तीय अर्थशास्त्र अशा विशेष शाखा उपलब्ध आहेत. सांख्यिकीसाठी बी.एस्सी. सांख्यिकी, एम.एस्सी. सांख्यिकी, ॲक्चुरियल सायन्स, डेटा ॲनालिटिक्स, बायोस्टॅटिस्टिक्स यासारखे कोर्सेस उपलब्ध आहेत. के विषय शिकवण्यासाठी आयआयटी, आयआयएम, बिट्स, आयसर भोपाळ, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भारतीय सांख्यिकी संस्था (कोलकता, बंगळुरु, दिल्ली), दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, मुंबई विद्यापीठ या प्रमुख संस्था मानल्या जातात.

# सीमकार्डचा कोपरा का कापतात?

आपण अनेक गोष्टी नियमितपणे वापरत असतो; मात्र त्या वस्तूसंदर्भात काही गमतीशीर गोष्टींची आपल्याला माहिती नसते. मोबाईलमध्ये सीमकार्डचा वापर वर्षानुवर्ष होत आहे; मात्र ९९ टक्के लोकांना हे माहीत नाही, की सीमकार्डचा एक कोपरा कट का केलेला असतो? त्यामागे काय कारण आहे? सीमकार्ड ही एक अशी वस्तू आहे, जिचा वापर लाखो लोक आपल्या मोबाईलमध्ये करतात.

सीमशिवाय कोणताही मोबाईल चालूच शकत नाही. तज्ज्ञांच्या मते या प्रकारे डिझाइन करण्यामागे सीम योग्य प्रकारे फीट व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. त्यामुळेच सीमकार्डचा एक कोपरा कापलेला असतो. सीम कार्डचा एक कोपरा कापल्यामुळे हे लोकांच्या लवकर लक्षात येते, की कार्ड कोणत्या दिशेने



बसवले आहे. मोबाईलमध्ये सीम उलटे लावल्यास मोबाईल चालणार नाहीच, पण सीमकार्ड खराबही होऊ शकते. सीम कार्डचे पूर्ण नाव 'सबस्क्रायबर आयडेंटिटी मॉड्यूल' असे आहे.

मोबाईल मॅनिया

हे सीमकार्ड मोबाईल डिव्हायसच्या सेल्युलर नेटवर्कला कनेक्ट करावे लागते. सीममध्ये 'इंटरनॅशनल मोबाईल सबस्क्रायबर आयडेंटिटी' (आयएमएसआय) नंबर आणि त्याच्याशी संबंधित कीज असतात. त्यामुळे सीम चालू झाल्यानंतर मोबाईल नीट काम करतो आणि आपण हवे त्याला फोन करू शकतो.

# 'रेअर अर्थ मॅग्नेट'विरहीत पहिली बाईक बाजारात

बंगळुरू येथील 'सिंपल एनर्जी' या इलेक्ट्रिक दुचाकी कंपनीने देशातील पहिली इलेक्ट्रिक मोटर विकसित केली आहे. तिच्यात दुर्मिळ पृथ्वी घटकां ('रेअर अर्थ मॅग्नेट')चा वापर केलेला नाही. याचा अर्थ या बाईकला आता चीनमधून आयात केलेल्या दुर्मिळ धातूंची आवश्यकता राहणार नाही. ही कामगिरी महत्त्वपूर्ण आहे, कारण काही महिन्यांपूर्वी चीनने भारतात 'रेअर अर्थ मॅग्नेट' घटकांचा पुरवठा थांबवला होता. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहन उद्योगावर लक्षणीय परिणाम झाला होता.

'सिंपल एनर्जी'ने या आव्हानाचे संधीत रूपांतर केले आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट'शिवाय बाईकचे व्यावसायिक उत्पादन सुरू करणारी पहिली भारतीय ऑटो कंपनी बनली. 'रेअर अर्थ मॅग्नेट' म्हणजेच 'निओडायमियम' आणि 'डिस्प्रोसियम'सारखे विशेष धातू. ते इलेक्ट्रिक मोटर्स जलद आणि टिकाऊ बनविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आतापर्यंत यापैकी बहुतेक धातू चीनमधून आयात केले जात होते. म्हणूनच चीनने भारतात 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या पुरवठ्यावर निर्बंध लादले, तेव्हा इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला मोठा धक्का बसला. तथापि, 'सिंपल एनर्जी'ने या आव्हानाचे संधीत रूपांतर केले.

कंपनीच्या 'इन-हाऊस रिसर्च अँड डेव्हलपमेंट' (आर अँड डी) टीमने पर्यायी साहित्य आणि स्मार्ट अल्गोरिदम विकसित केले. कंपनी म्हणते, की या बाईकचा अंदाजे



९५ टक्के भाग भारतात बनवला जातो. त्यामुळे आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होते. ही बाईक 'सिंपल एनर्जी'च्या लोकप्रिय इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये वापरली जाईल.

बाईक वर्ल्ड

कंपनीच्या तामिळनाडूतील होसूर येथील दोन लाख चौरस फूट कारखान्यात मोटरचे उत्पादन आधीच सुरू झाले आहे. 'रेअर अर्थ-फ्री बाईक' लाँच झाल्यामुळे भारतीय ईव्ही कंपन्यांना आता चीनवर अवलंबून राहावे लागणार नाही. याचा थेट परिणाम मोटर्स आणि बॅटरीच्या उत्पादन खर्चावर होईल. यामुळे इलेक्ट्रिक स्कूटर आणि चार्जिंग तंत्रज्ञानाच्या किमती देखील कमी होतील. याचा फायदा सामान्य ग्राहकांना होईल, कारण भविष्यात इलेक्ट्रिक स्कूटर अधिक परवडणाऱ्या आणि सुलभ होतील. शिवाय, हे पाऊल ईव्ही तंत्रज्ञानात भारताच्या स्वावलंबनासाठी एक मजबूत पाया रचेल.

## स्टाईल अँड ट्रेंड्स

### 'नो शो सॉक्स'चा नवा ट्रेंड



हिवाळ्यात थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मोजे घालणे आवश्यक आहे. काही काळापूर्वी घोट्यापर्यंत मोजे लोकप्रिय झाले होते; परंतु आता हा ट्रेंड बदलत आहे. घोट्यापर्यंतच्या पायघोळ आणि डेनिमचा ट्रेंड कमी झालेला नाही. तरुणांना लोफर्स आवडतात; परंतु घोट्यापर्यंतच्या मोज्यांसह फॅशनची समस्या निर्माण होते. तरुणांना असे मोजे हवे होते, जे त्यांच्या लोफर्सना ॲंकल-लेंग्थ पँटसह पूरक असतील. कदाचित म्हणूनच शहरातील तरुण आता 'नो-शो सॉक्स'ला महत्व देत आहेत. त्याला 'नो-शो सॉक्सना लोफर सॉक्स' असेही म्हणतात. ते 'लो-शो सॉक्स'पेक्षा लहान असतात. त्यामुळे दिसत नाहीत. यामुळे तरुणांना खूप आकर्षक लूक मिळतो. ते लोफर्स, शूज आणि स्नीकर्ससह घातले जातात. हे मोजे बहुउद्देशीय कारणांसाठीदेखील वापरले जात आहेत. ते आरामदायी आहेत. अनेक प्रमुख पोशाख ब्रँडदेखील यात सहभागी होत आहेत आणि 'नो-शो सॉक्स लाँच' करत आहेत. असे मोजे अमेरिकेत बऱ्याच काळापासून प्रचलित आहेत; परंतु भारतात फॅशन जागरूकता वाढल्याने अलिकडे त्यांची लोकप्रियता वाढली. तरुणांना लोफर्स आणि स्नीकर्स आवडतात आणि ते घोट्याच्या लांबीच्या पँटशी जुळत आहेत. परिपूर्ण लूक मिळवण्यासाठी ॲक्सेसरीजची आवश्यकता भासली. भारतातील मोजे बाजार ९०० ते १००० कोटी रुपयांचा असल्याचा अंदाज आहे.

# 'विंडोज १०'वर सुरक्षा अपडेट्स बंद

'मायक्रोसॉफ्ट'ने घोषणा केली आहे की ते पुढील महिन्यापासून विंडोज १० साठी सुरक्षा अपडेट्स जारी करणार नाही. विंडोज १० साठी सपोर्ट १४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपेल. यानंतर, हे विंडोज व्हर्जन वापरणाऱ्यांना मासिक मोफत सुरक्षा अपडेट्स मिळणार नाहीत. परिणामी हॅकर्स किंवा सायबर हल्लेखोर त्याचा फायदा घेऊ शकतात.

'विंडोज १०' साठी मोफत सपोर्ट बंद केल्याने जगभरातील लाखो वापरकर्त्यांची डिजिटल सुरक्षा धोक्यात येऊ शकते. या पार्श्वभूमीवर, मायक्रोसॉफ्टला सपोर्ट बंद करण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले जात आहे. 'कंझ्युमर रिपोर्ट्स' या अमेरिकन ग्राहक संघटनेने म्हटले आहे, की लाखो लोक असे डिव्हाइस वापरत आहेत, जे विंडोज ११ वर अपग्रेड केले जाऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत मायक्रोसॉफ्टने विंडोज १० साठी सपोर्ट बंद केला, तर या वापरकर्त्यांना सायबर हल्ल्यांचा धोका वाढेल. या वर्षी ऑगस्टपर्यंत ४६ टक्क्यांहून अधिक जागतिक वापरकर्ते विंडोज १० वापरत होते. यापैकी बहुतेक सिस्टीम विंडोज ११ च्या आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम नाहीत. वापरकर्त्यांकडे आता हे पर्याय आहेत.




सोफ्टवेअर अपडेट

मायक्रोसॉफ्टने या निर्णयामुळे प्रभावित झालेल्या वापरकर्त्यांसाठी अनेक पर्याय दिले आहेत. पहिला पेड कव्हर आहे. विंडोज १० वापरू इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांना ३० (अंदाजे रु. २,६५०) डॉलर्समध्ये एक वर्षाचे कव्हर मिळू शकते. हे पुढील वर्षी ऑक्टोबरपर्यंत संरक्षण प्रदान करेल. एक हजार मायक्रोसॉफ्ट रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करूनदेखील अतिरिक्त वर्षाचे कव्हर मिळू शकते. वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असलेला दुसरा पर्याय म्हणजे वनड्राईव्ह बॅकअप, जो मर्यादित कव्हर प्रदान करेल. या पलीकडे, वापरकर्त्यांना विंडोज ११ वर अपग्रेड करण्याचा पर्याय आहे.

# युरोपला पर्यटकांची पसंती

सुंदर निसर्गरम्य दृश्य, प्राचीन ऐतिहासिक वारसा आणि सांस्कृतिक संपन्नता यामुळे युरोप नेहमीच पर्यटकांची पहिली पसंती राहिला आहे आणि म्हणूनच तो प्रवासासाठीही जगभर प्रसिद्ध आहे. कोणत्या देशात काय पहावे, याचा हा लेखाजोखा.

*** इटली**

इतिहास, कला आणि उत्तम खाद्यपदार्थ यांचे मिश्रण असलेल्या इटलीचा समावेश प्रत्येक प्रवाशाच्या इच्छायादीत केला जातो. रोमच्या ऐतिहासिक स्थळांपैकी व्हेनिसचे कालवे आणि टस्कनीतील सुंदर वाईनरी त्याला खास बनवतात. इटलीतील लहान आणि कमी गर्दीची गावे शोधण्याचा कल वाढत आहे.

*** फ्रान्स**

पॅरिसव्यतिरिक्त नीस आणि प्रोव्हेन्ससारख्या शहरांमध्ये फिरणे अधिक ट्रेंडी आहे. लूव्र म्युझियम, आयफेल टॉवर आणि फ्रेंच रिव्हेरासारखी ठिकाणे याला अद्वितीय बनवतात. फ्रान्समधील उत्कृष्ट पाककृती आणि वाइन हीदेखील प्रवाशांसाठी विशेष



आकर्षणे आहेत.

*** स्पेन**

बार्सिलोना आणि माद्रिद ही स्पेनमधील आवर्जून पाहण्यासारखी शहरे आहेत. लोक बास्क देश आणि अंदालुसिया प्रदेशाच्या सांस्कृतिक वारशाचा शोध घेत आहेत. ला टोमॅटिना आणि बुल फाइटिंगसारखे सण त्याला खास बनवतात.

*** ग्रीस**

सँटोरिनी आणि मायकोनोसचे समुद्रकिनारे, अथेन्सचा इतिहास आणि ग्रीक खाद्यपदार्थ पर्यटकांना आकर्षित करतात. ग्रीसमधील लपलेली बेटे आणि गावे शोधण्यात लोकांचा रस वाढत आहे.

*** ऑस्ट्रिया**

व्हिएन्नाचे शाही रंग, साल्झबर्गचा सांगितीक वारसा आणि तिरोलचे सुंदर पर्वत ऑस्ट्रियाला युरोपचा जादुई देश बनवतात. हिवाळ्यात स्कीइंग आणि उन्हाळ्यात हायकिंगसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे.

*** पोर्तुगाल**

लिस्बन आणि पोर्टोचे रंगीबेरंगी रस्ते, डोरो व्हॅलीतील द्राक्षबागा आणि अल्गारवेचे समुद्र किनारे एक उदयोन्मुख गंतव्य स्थान बनवत आहेत. पोर्तुगीज खाद्यपदार्थही खवय्यांसाठी खास आकर्षण आहेत.

*** नॉर्वे**

धमाल भटकंती

निसर्गप्रेमींसाठी नॉर्वे हा सर्वात प्रेक्षणीय देश आहे. उत्तरेकडील दिवे, गीझर आणि नेत्रदीपक रोषणाईमुळे ते भेट देण्यासारखे आहे. नॉर्वेमध्ये इको फ्रेंडली टुरिझमची विशेष आवड आहे.

*** नेदरलँड**

ॲमस्टरडॅमचे कालवे, ट्युलिप गार्डन हे अनोखे बनवतात. नेदरलँड्समधील ग्रामीण सौंदर्य आणि लहान ऐतिहासिक शहरांचा शोध घेण्याचा ट्रेंड वाढत आहे.

*** स्कॉटलंड**

एडिंबर्गचा इतिहास, हायलँडचे नैसर्गिक सौंदर्य

# भाजप व काँग्रेस पक्षाकडून महापौर व उपमहापौरपदाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
नागपूर महानगर पालिकेच्या महापौरपदासाठी भाजपने नगरसेविका श्रीमती नीता ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला तर काँग्रेसकडून नगरसेविका श्रीमती स्नेहल ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल केला.

त्याचप्रमाणे उपमहापौरपदासाठी भाजपच्या उमेदवार नगरसेविका श्रीमती लीला हाथीबेड तर काँग्रेसकडून यापदासाठी नगरसेवक विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केला.

नागपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौरपदासाठी निवडणूक येत्या ६ फेब्रुवारी रोजी कविवर्य सुरेश भट सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. या प्रसंगी पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर उपस्थित राहणार आहेत.

नागपूर महानगरपालिकेच्या निगम सचिव डॉ. रंजना लाडे यांच्याकडे दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समितीच्या सभागृहात अर्ज दाखल केले. याप्रसंगी सचिवालय विभागाचे अधीक्षक ताराचंद खंडाते, वरिष्ठ लिपिक राजेश जामनकर, राजस्व निरिक्षक विलास धुर्वे, श्री. भूषण शेलार, मनोज जोशी, मृणाल बागडे, श्रीमती हीना बोरकर उपस्थित होते.

भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवार नगरसेविका (प्रभाग क्र. २८ क) श्रीमती नीता ठाकरे यांनी दोन प्रतींमध्ये अर्ज दाखल केले असून, सूचक म्हणून नरेंद्र (बाल्या) बोरकर व श्रीमती माया इवनाते आहेत तर या अर्जांवर अनुमोदक म्हणून नगरसेविका श्रीमती अश्विनी जिचकार व श्रीमती निरंजना पाटील यांच्या स्वाक्षरी आहेत.

त्याचप्रमाणे भाजपच्या उपमहापौरपदाच्या उमेदवार नगरसेविका (प्रभाग क्र. २९ क) श्रीमती लीला हाथीबेड यांनीही दोन उमेदवारी अर्ज दाखल केले असून, यावर सूचक म्हणून नगरसेविका श्रीमती मंगला खेकरे व नगरसेवक विनोद कन्हेरे यांच्या स्वाक्षरी आहेत, तर अनुमोदक म्हणून नगरसेवक कल्पक भनारकर व नगरसेविका मनीषा अतकरे यांच्या स्वाक्षरी आहेत.

यावेळी माजी महापौर दयाशंकर तिवारी, आमदार कृष्णा खोपडे, मोहन मते, माजी आमदार अनिल सोले, गिरीश व्यास, भाजपचे गटनेते नरेंद्र बोरकर यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.





### काँग्रेसकडून स्नेहल ठाकरे विवेक निकोसे

काँग्रेसकडून महापौरपदाच्या उमेदवार म्हणून नगरसेविका (प्रभाग क्र. ११ ब) श्रीमती स्नेहल ठाकरे यांनी निगम सचिव डॉ. रंजना लाडे यांच्याकडे दाखल केला. या अर्जावर सूचक म्हणून नगरसेविका श्रीमती सरस्वती सलामे तर अनुमोदक म्हणून नगरसेविका श्रीमती मंजु चाचेरकर यांची स्वाक्षरी आहे.
उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचे नगरसेवक (प्रभाग क्र. ९ अ) विवेक निकोसे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्जावर सूचक म्हणून नगरसेवक प्रमोद जोगिंदर सिंग ठाकूर तर अनुमोदक म्हणून नगरसेविका श्रीमती प्रगती यादव यांच्या स्वाक्षरी आहे. यावेळी काँग्रेसचे गटनेते नगरसेवक संजय महाकाळकर, नगरसेविका श्रीमती सरस्वती सलामे, नगरसेविका श्रीमती मंजु चाचेरकर, नगरसेवक प्रमोद जोगिंदर सिंह ठाकूर उपस्थित होते.

# मनपात महिला राज



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २ :**
नागपूर महानगरपालिकेच्या सत्ताकारणात महिलांचे नेतृत्व अधिक ठळकपणे पुढे आले आहे. महापौरपदी नीता ठाकरे यांची निवड झाल्याने शहराच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला असून, उपमहापौर पदाची जबाबदारी लीला हाथीबेड यांनी स्वीकारली आहे.

या दुहेरी महिला नेतृत्वामुळे नागपूरच्या विकास प्रक्रियेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महापौर नीता ठाकरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहराचा सर्वांगीण विकास हेच प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. स्वच्छ नागपूर अभियानाला गती देणे, पायाभूत सुविधा मजबूत करणे, नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे तसेच महिलांच्या सशक्तिकरणासाठी विशेष योजना राबवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नागपूर हे स्मार्ट आणि सुरक्षित शहर म्हणून विकसित करण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

उपमहापौर लीला हाथीबेड यांनी महापालिकेचा कारभार पारदर्शक आणि प्रभावीपणे चालवण्याचे आश्वासन दिले. सर्व पक्ष, अधिकारी आणि नागरिकांना सोबत घेऊन विकासात्मक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या समस्या तत्काळ सोडवण्यासाठी प्रशासन अधिक संवेदनशील आणि जबाबदार राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महिला नेतृत्वाच्या या जोडीकडून नागपूरकरांना मोठ्या अपेक्षा आहेत. विकास, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि नागरिक सुविधांच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेच्या कारभारात सकारात्मक बदल घडतील, अशी भावना शहरातील विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

## श्रीचंद तेजवानी होणार अमरावतीचे महापौर



■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २ :**
अमरावती महापालिकेत युवा स्वाभिमान आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सहकार्याने भाजपची सत्ता स्थापन होईल. अमरावतीच्या १७ व्या महापौरपदासाठी श्रीचंद तेजवानी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. पण, त्यांच्याकडे अडीच वर्षांपैकी सव्वा वर्षेच हे पद राहणार आहे. नंतरच्या सव्वा वर्षासाठी ही जबाबदारी आशीष अतकरे यांच्याकडे सोपविण्यात येणार आहे.

येथील हॉटेल महफिल इनमध्ये भाजपच्या नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत महापौरपदाच्या उमेदवारांची निवड जाहीर करण्यात आली. श्रीचंद तेजवानी हे नगरसेवकपदी दुसऱ्यांदा निवडून आले असून जवाहर स्टेडियम या प्रभागाचे प्रतिनिधित्व करतात. तर आशीष अतकरे गडगडेश्वर प्रभागातून निवडून आले आहेत.

येत्या ६ फेब्रुवारी रोजी अमरावती महापालिकेच्या महापौरपदासाठी निवडणूक होणार असून श्रीचंद तेजवानी यांची महापौरपदी निवड झाल्यास ते पहिले सिंधी महापौर ठरणार आहेत. तेजवानी यांना महापौर बनवावे, अशी मागणी शहरातील ६ पूज्य सिंधी पंचायतींनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती.

सिंधी समुदायाने नेहमीच भाजपला पाठिंबा दिला असल्याने या समुदायाला यावेळी संधी मिळावी, असे निवेदन पंचायतींच्या वतीने पालकमंत्र्यांना देण्यात आले होते. आशीष अतकरे यांना सव्वा वर्षांनतर महापौरपद मिळू शकेल. भाजपने दोघांची निवड जाहीर करून सोशल इंजिनिअरिंग साधण्याचा प्रयत्न केला आहे.

श्रीचंद तेजवानी हे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार पुरूषोत्तम बजाज यांना पराभूत करून जवाहर स्टेडियम प्रभागातून निवडून आले आहेत. तर आशीष अतकरे यांनी गडगडेश्वर-रवीनगर प्रभागातून निकटचे प्रतिस्पर्धी असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवाराचा पराभव केला होता.

या दोघांच्या विरोधात युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी जोरदार प्रचार केला होता. सत्ता स्थापनेसाठी भाजपने युवा स्वाभिमानची मदत घेतली असली, तरी या दोघांच्या नावावर शिक्कामोर्तब करून भाजपने रवी राणा यांना स्पष्ट संकेत दिल्याचे मानले जात आहे.

**युवा स्वाभिमानकडे उपमहापौरपद**
उपमहापौरपद भाजपचा सहकारी पक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाकडे देण्याचा निर्णय भाजपने घेतला असून या पक्षातर्फे सचिन भेंडे यांना संधी मिळू शकेल. स्थायी समिती सभापतीपद कुणाला मिळेल, हे अद्याप ठरलेले नाही.

## अपघाती मृत्यू ४० टक्क्यांनी कमी करणार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :**
पुणे शहरात अपघाती मृत्यूचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट पुणे पोलिसांनी ठेवले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी ही माहिती दिली. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मागील वर्षी पुणे शहरात दारू पिऊन वाहन चालवल्याप्रकरणी सहा हजार जणांवर कारवाई करण्यात आली होती. ही मोहीम यापुढेही तीव्र करण्यात येणार आहे. शहरात कोणीही दारू पिऊन वाहन चालवणार नाही, हे सुनिश्चित करण्याचे पोलिसांचे लक्ष्य आहे. पुणे वाहतूक विभागातर्फे शिवाजीनगर मुख्यालयात आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६' समुपदेशन व मार्गदर्शन शिबिरात अमितेश कुमार बोलत होते.

## शिवसेना उबाठा आणि वंचितची गटनोंदणी : महापौरपदावर दावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
चंद्रपूर महापालिकेत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी मिळून आठ सदस्यांचा गट स्थापन करण्यात आला असून आज नागपुरातील विभागीय आयुक्त कार्यालयात राहुल दुरुगकर गट यांच्या नेतृत्वात गटनोंदणी करण्यात आली आहे. चंद्रपूर महापालिकेत ठाकरे सनेचे सहा आणि वंचित बहुजन आघाडीचे दोन सदस्य आहेत.

चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार आणि चिमूरचे आमदार बंटी भांगडीया यांनी तसेच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी संपर्क साधला आहे. जो पक्ष आमच्या आघाडीला महापौरपद देईल त्या पक्षाला पाठिंबा देऊ, असे शिवसेनेचे (ठाकरे) संदीप गिऱ्हे यांनी सांगितले. चंद्रपूर महापालिका महापौरपदासाठी आवश्यक संख्याबळ भाजप आणि भाजप या दोन प्रमुख पक्षाकडे नसल्याने सत्ता स्थापनेचा तिढा कायम आहे, तर दुसरीकडे काँग्रेस आणि भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांमधील अंतर्गत वाद उघडपणे समोर आले आहेत.

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले असून त्यांच्या सोबत आघाडीत लढलेल्या जनविकास पक्षाचे तीन नगरसेवक आहेत. अशा प्रकारे काँग्रेस आघाडीचे एकूण संख्याबळ ३० आहे. महापौरपदासाठी बहुमत सिद्ध करण्यासाठी काँग्रेसला आणखी चार नगरसेवकांची गरज आहे.

दुसरीकडे भाजपचे २३ नगरसेवक असून त्यांच्या युतीतील शिंदे शिवसेनेचा एक नगरसेवक आहे. भाजप-शिवसेना युतीचे एकूण संख्याबळ २४ असून सत्ता स्थापनेसाठी त्यांना अजून दहा नगरसेवकांची आवश्यकता आहे.

## क्षयरोग - कारणं, लक्षणं आणि उपचार

### लोकारोग्य




सामान्यतः टीबी म्हणून ओळखला जाणारा क्षयरोग हा गंभीर आजार आहे. हा फुफुसांचा विकार असून तो संसर्गजन्य आजार आहे. क्षयरोग हा एक प्रचलित जागतिक स्वरूपाचा आजार असला तरी विकसित देशांमध्ये हा आजार सामान्य आहे. एकेकाळी दुर्मिळ असलेला हा आजार १९८५ पासून एच आय व्ही एड्स च्या प्रकरणामध्ये वाढ झाल्यापासून हा आजार वाढू लागलेला आहे. शरीराची प्रतिकारशक्ती कमी होत जाऊन प्रसंगी मृत्यू ओढवणारा असा क्षयरोग आजार असल्यामुळे रुग्णाची योग्य देखभाल महत्वाची ठरते. मुळात, क्षयरोग हा आजार का होतो?त्याची कारण काय आहेत? क्षयरोगाची बाधा झाल्याची लक्षण काय असतात?आणि या आजारावर उपचार काय आहेत? या प्रश्नाची उकल करण्यासाठी क्षयरोगतज्ज्ञ डॉ. देवेंद्र केदारे यांच्याशी बातचीत.

**क्षयरोग म्हणजे नक्की काय आजार आहे?**
■ क्षयरोग ज्याला प्रचलित भाषेत टीबी असं संबोधलं जात हा एक संसर्गजन्य आणि फुफुसाशी संबंधित असलेला आजार आहे. हा आजार म्हणजे एक जिवाणू संसर्ग असून संसर्गजन्य व्यक्तीपासून निरोगी व्यक्तीमध्ये या आजाराचा संक्रमित थेंबाद्वारे म्हणजे खोकणे किंवा शिंकण्यातून हा आजार पसरतो. या आजारात शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते आणि दुर्लक्ष केल्यास अशा रुग्णाचा मृत्यू देखील ओढवतो.

**क्षयरोगाची कारण काय आहेत?**
■ जेंव्हा आपण बोलतो, खोकतो किंवा शिंकतो तेंव्हा आपण सूक्ष्म थेंब हवेत सोडतो. हे आपल्या सहसा लक्षात येत नाही. हे मायक्रो ड्रॉप्लेट्स टीबी निर्माण करणाऱ्या जंतूंचे वाहक बनतात. सक्रिय क्षयरोगबाधित व्यक्तीच्या विविध कृतीद्वारे या जिवाणूंचा सहज प्रसार होतो.

क्षयरोग होण्यामागे शरीराची प्रतिकारशक्ती,आयव्ही औषधांचा वापर, मोठ्या प्रमाणात अल्कोहोलचे सेवन, क्षयरोगबाधित व्यक्तीसोबत राहणे, जास्त गर्दीच्या परिसरात काम करणे अशा विविध कारणामुळे क्षयरोगाचा प्रसार होतो.

**क्षयरोगाची नेमकी लक्षण काय असतात?**
■ क्षयरोगाची प्रामुख्याने दोन प्रकारची लक्षण असतात. सुप्त क्षयरोग आणि सक्रिय क्षयरोग. सुप्त क्षयरोग या प्रकारात ज्या व्यक्तीला क्षयरोगाची बाधा झालेली आहे परंतु कोणतीही लक्षण मात्र दिसत नाहीत,या प्रकाराला टीबी संसर्ग किंवा निष्क्रिय टीबी असेही म्हणतात. सक्रिय क्षयरोगांमध्ये जिवाणूंची बाधा झल्यानंतर अशा व्यक्तीला भूक न लागणे,रात्रीचा घाम येणे,थकवा जाणवणे, छातीत दुखणे, सतत खोकला आणि श्वाशोश्वास करण्यास त्रास होणे,सर्दी आणि खोकताना रक्त पडणे अशी लक्षण दिसतात.

**क्षयरोगाचे निदान कसे करतात? आणि उपचार काय आहेत?**
वैद्यकीय तपासणी करून टीबी ची लक्षण जाणून घेऊन निदान करता येते. ट्युबरक्युलीन स्किन टेस्ट, रक्त परीक्षण, छातीचा एक्सरे, सिटी स्कॅन, थुंकीची चाचणी याद्वारे क्षयरोगाचे निदान करता येते. या आजरावर प्रतिजैविक देऊन उपचार करता येतात. आयसोनियाझिद, रिफाम्पीन, इथंब्युटॉल,आणि पायराझिनामाईड हि औषध दिली जातात. थेट निरीक्षण थेरेपी, फॉलोअप चाचणी,संसर्ग नियंत्रण आणि अशा व्यक्तीचा भरपूर आणि पौष्टिक आहार या माध्यमातून क्षयरोग बरा केला जातो. ■ ■ ■

## गट नोंदणीवर वडेट्टीवार समर्थकांचा आक्षेप
# वाद नगरविकास विभागाकडे

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर / नागपूर, दि. २ :**
चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेस गटाच्या नोंदणीवरून निर्माण झालेला पक्षांतर्गत वाद आता राज्याच्या नगरविकास विभागाकडे पोहोचला असून, या वादावर अंतिम निर्णय येईपर्यंत काँग्रेस गट नोंदणीचा प्रश्न प्रलंबित राहणार आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या गट नोंदणीवर काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार समर्थक नगरसेवकांनी आक्षेप घेतल्यानंतर नागपूर विभागीय आयुक्तांनी हा प्रस्ताव नगरविकास खात्याकडे पाठविला आहे.

चंद्रपूर महापालिकेसाठी काँग्रेसचा अधिकृत गट नोंदविण्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर गेल्या शुक्रवारी नागपूर येथे दाखल झाल्या होत्या. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसारच महापालिकेतील गटनेतेपदाची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या सूचनेनुसार सुरेंद्र अडबाले यांची गटनेतेपदी निवड करण्यात आल्याचा दावा धानोरकर यांनी केला होता. नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांनी काँग्रेस गटाच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली. यावेळी १३ नगरसेवकांची यादी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्याकडे देण्यात आली.

प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसारच गट नोंदणी करण्यात आली आहे. पक्षाने ज्या व्यक्तीचे नाव गटनेतेपदी सुचविले, त्याच व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. नोंदणीकृत गटच अधिकृत मानला जातो.ह्व काही नगरसेवक पक्षांतर्गत राजकारणामुळे वेगळ्या भूमिकेत गेले असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र, संबंधित नगरसेवकांनी अधिकृत गटात सहभागी व्हावे, अन्यथा पक्षविरोधी कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला होता.

दरम्यान, काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांचे समर्थक नगरसेवक देखील विभागीय आयुक्त कार्यालयात उपस्थित होते. धानोरकर गटाकडे बहुमत नसून आमच्याकडे १६ नगरसेवक आहेत, त्यामुळे त्यांच्या गटाला मान्यता देऊ नये, अशी मागणी वडेट्टीवार समर्थकांनी केली. या तक्रारीची दखल घेत विभागीय आयुक्तांनी चंद्रपूर काँग्रेसमधील गटतटाचा प्रश्न सोडविण्यासाठी संपूर्ण प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला.

## जन्म दाखल्यांचा महाघोटाळा

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ :**
जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील शेंदूरसणी या छोट्याशा गावातून समोर आलेल्या २७ हजार ३४९ बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, राज्याच्या गृहविभागाने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली असून, एसआयटीने या प्रकरणी ११ आरोपींना अटक केली आहे.

बनावट जन्म दाखला घोटाळ्यातील २ आरोपी अद्याप फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते किरीट सोमय्या उद्या (मंगळवार) यवतमाळ दौऱ्यावर येत आहेत. शेंदूरसणी गावाची एकूण लोकसंख्या अवघी दीड हजार आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत ग्रामपंचायतीच्या 'सीआरएस' पोर्टलवर २७ हजार ३४९ जन्म आणि ११ मृत्यूच्या संशयास्पद नोंदी आढळल्या. या ग्रामपंचायतीचा लॉगिन आयडी मुंबईतून वापरला जात होता.


swisslog healthcare

## स्विसलॉग हेल्थकेअर भारतातील आरोग्यसेवेला बळकटी देण्यासाठी वचनबद्ध


फार्मसी ऑटोमेशन आणि डिलिव्हरी ट्रान्सपोर्टमधील जागतिक अग्रणी असलेल्या स्विसलॉग हेल्थकेअरने, या प्रदेशात प्रगत फार्मसी व्यवस्थापन उपायांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, आपल्या भारतातील कामकाजाच्या धोरणात्मक विस्ताराची घोषणा केली.

गुरुग्राम येथे मुख्यालय असलेल्या या विस्तारामुळे सिद्ध ऑटोमेशन तंत्रज्ञान भारतीय आरोग्य सेवा प्रदात्यांच्या अधिक जवळ आले आहे, ज्यामुळे रुग्णालये आणि फार्मसीच्या कामकाजात अचूकता, शोधक्षमता, रुग्णांची सुरक्षा आणि कार्यात्मक कार्यक्षमता वाढेल.

स्विसलॉग हेल्थकेअर सिंगापूर, मलेशिया, थायलंड आणि आता भारतात कार्यालये उघडून आशिया पॅसिफिकमध्ये आपला विस्तार वेगाने करत आहे. भारतातील रुग्णालयांना वाढत्या कार्यात्मक गुंतागुंत आणि खर्चाच्या दबावांना सामोरे जाण्यास मदत करण्यासाठी, स्विसलॉग हेल्थकेअर वाहतूक ऑटोमेशन (ट्रान्सपोनेट न्यूमॅटिक ट्यूब), फार्मसी ऑटोमेशन (बॉक्सपिकर> इव्होटेक> पिलपिक> ऑक्टेव्ह, युनिपिक>) आणि कोल्ड-चेन सोल्यूशन्स (टेनुटो) यांचा समावेश असलेला एक व्यापक फार्मसी तंत्रज्ञान पोर्टफोलिओ सादर करेल.

आंतररुग्ण आणि बाह्यरुग्ण या दोघांच्याही सेवेला आधार देण्यासाठी डिझाइन केलेले हे जागतिक स्तरावर सिद्ध झालेले उपाय भारताचा आवाका, लोकसंख्याशास्त्र आणि विकसित होत असलेल्या आरोग्यसेवा गरजांसाठी अत्यंत समर्पक आहेत. एकत्रितपणे, हे उपाय आरोग्य सेवा प्रदात्यांना कार्यक्षमता सुधारण्यास, औषधांची सुरक्षा वाढविण्यात आणि मोठ्या प्रमाणावर सातत्यपूर्ण रुग्ण-केंद्रित काळजी प्रदान करण्यास सक्षम करतील. ■ ■ ■


## ओळख वैद्यक उपकरणाची सीटी स्कॅन मशीन



सीटी स्कॅन (Computed Tomography Scan) मशीन ही क्ष-किरण (X-ray) आणि संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून शरीराच्या अंतर्गत अवयवांच्या, हाडांच्या आणि ऊतींच्या अत्यंत तपशीलवार 3D प्रतिमा तयार करते. हे एक प्रगत रेडिओलॉजी निदान साधन आहे, जे सामान्य एक्स-रे पेक्षा अधिक स्पष्टता देते आणि अंतर्गत दुखापत, ट्यूमर किंवा रोगांचे त्वरित निदान करण्यासाठी मदत करते.

या मशीनमध्ये एक बोगद्यासारखा भाग असतो आणि एक सरकणारा टेबल असतो. रुग्ण या टेबलवर झोपतो आणि तो बोगद्यातून जातो. मशीन रुग्णाभोवती फिरून वेगवेगळ्या कोनातून क्ष-किरण घेते.

क्ष-किरणांच्या माहितीवर संगणक प्रक्रिया करतो आणि शरीराच्या अवयवांचे 'स्लाईस' किंवा आडवे काप (cross-sectional images) तयार करतो.

या मशीनचा उपयोग मेंदूतील रक्तस्राव, हाडांची फ्रॅक्चर, अंतर्गत अवयवांचे ट्यूमर (कॅन्सर), संसर्ग, अंतर्गत सूज किंवा रक्ताच्या गाठी शोधण्यासाठी वापर होतो.

काही वेळा अवयव अधिक स्पष्ट दिसण्यासाठी रुग्णाला आयोडीनयुक्त 'डाई' किंवा 'कॉन्ट्रास्ट' दिले जाते, जे तोंडावाटे किंवा शिरेतून दिले जाऊ शकते.

संपूर्ण प्रक्रिया सहसा १५ ते ३० मिनिटांत पूर्ण होते, जी खूप जलद आहे. सीटी स्कॅन हे रोगाच्या निदानासाठी आणि उपचारांच्या नियोजनासाठी एक अत्यंत प्रभावी आणि सुरक्षित साधन मानले जाते, जे क्लिष्ट आजारांचे अचूक निदान करते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## महापौर, उपमहापौरांचा पदग्रहण सोहळा



■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. २ :**
अकोला महानगरपालिका नवनियुक्त महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर आणि उपमहापौर अमोल सुधाकर गोगे यांचा पदग्रहण सोहळा आज सोमवारी संपन्न झाला. याप्रसंगी आमदार वसंत खंडेलवाल, सौ. सुहासिनीताई धोत्रे, सौ. मंजुषाताई सावरकर, माजी महापौर तथा नगरसेवक विजय अग्रवाल, नगरसेवक तथा भाजपा महानगर अध्यक्ष जंयतराव मसने, गटनेता पवन महल्ले, नगरसेविका उषाताई विर्क, माजी उपमहापौर तथा सामाजिक कार्यकर्ते सुनिल मेश्राम, संग्राम गावंडे यांच्यासह शहर सुधार आघाडीचे सर्व नगरसेवक, नगरसेविका प्रामुख्याने उपस्थित होते.

महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर आणि उपमहापौर अमोल सुधाकर गोगे यांचे मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांनी सत्कार करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दादांच्या अस्थी पोहचल्या वर्ध्यात




■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २ :**
उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थी बारामती येथून अमरावती मार्गे वर्ध्यात दाखल झाल्याते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे वर्ध्यातील नेते यावेळी उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष शरद सहारे, नेते राणा रणनवरे, सुधीरबाबू कोठारी, माजी आमदार राजू तिमांडे, आशिष ठाकरे, गजानन खोंड आदी नेत्यांनी अस्थीचे दर्शन घेतले. वर्धा जिल्ह्यातील अजितदादा यांच्या समर्थक व जनतेसाठी हा अस्थीकलश दर्शनासाठी ठेवण्यात आला आहे. वर्ध्याच्या इंदिरा मार्केट येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालय परिसरात या अस्थी दर्शनासाठी ठेवण्यात आल्या. उद्या सकाळी शोकसभेचे आयोजन करण्यात आले.